MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा • ठाणे



# व्ही. पी. एम्. दिशा

वर्ष नववे / अंक १२ / नोव्हेंबर २००८

## संपादकीय

## भावा आणि अभिनिवेश

१ मे २०१० रोजी महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीला ५० वर्षे पूर्ण होणार आहेत. याबरोबरच मराठी भाषेला राजाश्रय देण्यात आला या घटनेलाही ५० वर्षे पूर्ण होतील. 'राजाश्रय देण्यात आला' याचा आज लक्षात आलेला अर्थ तशा अर्थाचे कागदी घोडे नाचवले गेले असा आहे. कारण, या अर्थ शतकी वाटचालीत ''मराठीची गळचेपी होत आहे,'' ''मराठी अस्मिता लयाला जात आहे'' या संबंधी अनेक भाषाभिमान्यांनी सूर आळवून झाले आहेत. जनभाषा आणि राजभाषा असलेल्या स्वत:च्या भाषेचा वापर न करणे किंवा वापर करण्याबाबत उदासीन असणे हा सामाजिक द्रोह असतो. स्वत:चे आर्थिक हित जपण्यामध्ये कृतार्थता मानणाऱ्या संबंधित समाजधुरीणांना या सामाजिक द्रोहाशी काही देणे घेणे नाही. त्यामुळे 'मराठी माध्यमाच्या शाळांची स्थिती वाईट आहे.' 'मराठी भाषेची गळचेपी चालू आहे' अशा आशयाचे वर्तमानपत्री लेख, त्यांतील प्राध्यापकी विद्वत्तेचा थाट, मराठी वाहिन्यांचा भाषाभिनिवेश हे सर्व 'नक्राश्रू' या वर्गात मोडणारे ठरत आहे.

'भाषा आणि जीवन' या त्रैमासिकाच्या अलिकडील एका अंकातील (वर्ष २६ : अंक ४) मराठीच्या राजाश्रय व लोकाश्रयासंबंधीतील संपादकीय वाचण्यात आले. मराठी भाषेचा इतिहास नीट लक्षात घेतला, हा इतिहास ज्या साहित्याच्या माध्यमातून तपासला जातो त्या साहित्याचे माध्यम नीट लक्षात घेतले तर सदर संपदकीयातील मराठीला संस्कृतप्रमाणे व नंतर इंग्रजीप्रमाणे मान मिळाला नाही या मुद्याचे नवल वाटते. मराठीसह सर्व उत्तर भारतीय भाषा संस्कृतोद्भव आहेत, हे माहीत असूनही संस्कृतचा दर्ज, मराठीचा दर्जा हे भेद करणे तर्कापलीकडील आहे. संस्कृत श्रेष्ठ आहे असे म्हणत मराठीला आश्रय नाही, ती उपेक्षित आहे याचे टाळ्या मिळवणारे दु:ख पिटायचे यामुळे मराठी माणसाची दिशाभूल होते, असे आम्हांस वाटते.

'श्रीचामुण्डरायें (जे) करवियले (ली) व गंगाराज सुत्ताले करवियले (ली)' या दोन वाक्यांची नोंद ही मराठी भाषेची सुरुवात मानण्यात येते. त्यानुसार मराठी भाषेचा इतिहास हजार एक वर्षे मागे जाईल. संस्कृत ही त्याहीपूर्वी पासून अस्तित्वात व मुख्य म्हणजे व्यवहारातील भाषा असल्याने संस्कृत कवींची संख्या, मराठी कवींची संख्या हे तुलनेचे मुद्देच होऊ शकत नाही. म्हणूनच या संपादकीयातील संत कवींचे कर्तृत्व संत म्हणून श्रेष्ठ की कवी म्हणून श्रेष्ठ हा ही

(मुखपृष्ठ २ वर)

मुख्यपृष्ठावरून
संपादकीय
**भाषा आणि अभिनिवेश**

मुद्दा महत्त्वाचा नाही. अशा प्रकारचे मुद्दे किंवा विचार हे अभिनिवेशी ठरतात. वस्तुस्थिती दर्शवत नाहीत.

भारतातील सर्व प्राचीन अभिजात साहित्य संस्कृतात आहे. मराठीत नाही. मराठी ही संस्कृतोद्भव आहे हे मान्य करताना अकारण संस्कृतचा दुस्वास करायचा ही मानसिकता समजण्यापलीकडील आहे. भाषा ही जिवंत घटना असते, व्यवहाराचे माध्यम असते याचा तटस्थपणे विचार केल्यास अभिनिवेशी विधाने करण्याचा मोह टाळता येईल. राजाश्रयावरून भाषेची प्रतिष्ठा मोजावयाची असती, तर ज्या शासनकर्त्यांनी मराठीला हा आश्रय असल्याचे वारंवार सांगितले त्या शासनाचा कारभार इंग्रजीत चाललेला दिसला नसता. इतिहासातील साहित्याची वळणे, त्या विशिष्ट वळणांचे कर्तृत्व, मोठेपण ज्याचे त्याला असतेच. मराठी भाषेच्या अभिवृद्धीला कारणीभूत ठरलेले कोश मोल्यवर्थ व  कँडी यांनी निर्माण केले हा इतिहासच आहे.या कोशकारांचे इंग्रजपण हा मुद्दा अधोरेखित करत कामाचे महत्त्वकमी करण्याचा प्रयत्न कोणी का करावा?


हजार वर्षांच्या वाटचालीमध्ये संस्कृतसह, उर्दू, प्राकृत व अन्य अनेक भाषांचा मराठीवर परिणाम झाला. भाषेच्या जडणघडणीत शब्दसिद्धी आणि तिचा विचार हेही महत्त्वाचे ठरतात. कितीही परभाषी शब्द मराठीत आले तरी संस्कृतोद्भव भाषा असल्याने तत्सम शब्दांचा भक्कम आधार मराठीला आहे व तो समजण्यासारखाही आहे.

ज्या गळचेपीचा वारंवार उल्लेख केला जातो. टाळ्या मिळवल्या जातात ती गळचेपी करणारी माणसे मराठीच असतात हेही विचित्र आहे. माहिती तंत्रज्ञानाचा प्रभाव असणाऱ्या आजच्या द्विपर्यायी (बायनरी) संस्कृतीचा आपल्या विचार व अभिव्यक्ती पद्धतींवर परिणाम होत आहेच. या द्विपर्यायी विचार पद्धतींमुळे आपल्या जगण्याच्या ज्या शक्यता असतात त्यांच्या दिशा बदलताना जाणवत आहेत. अशा वेळी भाषेच्या श्रेष्ठ कनिष्ठतेचे परंपरागत तुणतुणे वाजवत बसण्यापेक्षा भाषाभिवृद्धीच्या भविष्यातील शक्यतांचा विचार भाषा अधिक समृद्ध करणारा ठरेल. काळानुसार भाषेची स्पंदने ओळखणे व मग भाषाशास्त्रीय चिकित्सांचा विचार मांडणे हे भाषातज्ज्ञांप्रमाणेच भाषाप्रेमींचेही काम आहे.

मराठीचा आम्हाला खरोखरच विकास करावयाचा असेल, ती प्रमाण भाषा करावयाची असेल तर शब्दनिर्मिती होणे गरजेचे आहे. संस्कृत भाषेचे शब्द भंडार समृद्ध आहे. अनुभवांतून संस्कृतच्या आधारे शब्द संपदा वाढवत राहणे, पक्क्या व्याकरणाची बैठक सिद्ध होत राहणे महत्त्वाचे आहे. यासाठी इंग्रजीचा आधार घेणे कर्मदरिद्रीपणाचे आहे.

इंग्रजीचे महत्त्व हे ती ज्ञानभाषा म्हणून विकसित होत गेली, विस्तारत गेली यामुळे आहे. हे महत्त्व भाषाशास्त्रीय दृष्ट्या नाही हे लक्षात घ्यायला हवे. म्हणूनच मराठी ही संस्कृतोद्भव असल्याचे ध्यानात ठेवून अनुभवसिद्ध असे संस्कृतातील शब्द मराठीत आणणे, सामाजिक व वैज्ञानिक विषयांवरील लेखन मराठीत करणे

(पृष्ठ क्रमांक ३८ वर)




**वर्ष नववे / अंक १२ / नोव्हेंबर २००८**

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
प्रा.. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १३ वे / अंक ५ वा)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
www.vpmthane.org

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिंटस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
Email : perfectprints@gmail.com

## *अनुक्रमणिका*

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संत श्रेष्ठ बहिणाबाई | श्री. शं. बा. मठ | ३ |
| २) | भारतीय संस्कृती -बीज, मॉडेल व साधना | श्री. यशवंत साने | ९ |
| ३) | युरोपची तोंड ओळख | सौ. सुनीता खरे | १२ |
| ४) | एस्. एस्. सी. परीक्षा आणि अंतर्गत मूल्यमापन | श्री. प्र. द. अरदकर | २० |
| ६) | घर एक मंदिर | श्री. यशवंत माने | २४ |
| ७) | डॉ. बेडेकर विद्या मंदिराची- समर्थ धुरा! | - | २६ |
| ८) | आनंदाचा झरा | श्री. सुरेंद्र लागू | २८ |
| ९) | दि स्टेटमन्स इयरबुक-२००९ | प्रा. एन. एस. बारसे | ३१ |
| १०) | परिसर वार्ता | संकलित | ३२ |
| ११) | एका कर्म योग्याचे प्रकट चिंतन | प्रा. मोहन पाठक | ३७ |
| १२) | वेळणेश्वरचे भूमिपूजन - वृत्तांत | प्रा. एन. एस. बारसे | ३९ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# आवाहन

विद्या प्रसारक मंडळ, ठाणे ही संस्था ठाण्यात गेली ७५ वर्षांहून अधिक काळ शिक्षणक्षेत्रात कार्य करीत आहे. मराठी व इंग्रजी शाळांबरोबरच कला, वाणिज्य, विज्ञान विधी व्यवस्थापन शाखांची महाविद्यालये, तंत्रनिकेतन व प्रगत अभ्यास केंद्र अशा सर्वांगीण शिक्षणाची सोय संस्थेने केली आहे. पाठ्यपुस्तकीय शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या अंगचे कला, क्रीडा इ. क्षेत्रातील गुण विकसित व्हावेत म्हणून विविध उपक्रम संस्था राबवीत आली आहे. या सर्वांच्या परिणामस्वरूप संस्थेचे विद्यार्थी अभ्यास व अभ्यासेतर परीक्षा व स्पर्धांत उत्तम यश मिळवीत असून संस्थेचे माजी विद्यार्थी समाजात विविध क्षेत्रांत कार्यप्रवण आहेत.

टी.व्ही., व्हिडिओ, सिनेमा व तत्सम नियतकालिके भोगवादी, नीतीहीन संस्कृतीचा प्रसार करण्यात अग्रेसर आहेत. याउलट विधायक, संस्कृतिरक्षक विचार पोचवतील अशी माध्यमे अल्पसंख्य आहेत. संस्कारक्षम विद्यार्थ्यांना, वाचकांना, नागरिकांना वैचारिक खाद्य पुरवावे, त्यांच्यात ईर्षा निर्माण व्हावी व त्यांनी अर्थार्जन व व्यावसायिक यशाबरोबरच सामाजिक कार्य साधावे, या उद्देशाने मंडळाने **'दिशा'** हे नियतकालिक जुलै १९९६ पासून सुरू केले आहे.

**या मासिकाचे वर्गणीदार होऊन किंवा या मासिकात जाहिरात देऊन आपण आमच्या कार्याला हातभार लावावा ही विनंती !** तसेच, आपल्या अमूल्य देणग्या देऊनही आपण दिशासाठी हातभार लावू शकता.

संपादक, दिशा

**विद्या प्रसारक मंडळ, नौपाडा, ठाणे.४०० ६०२**

दूरध्वनी : २५४२ ६२७०

**टीप** : वर्गणी /जाहिरात वा देणगीची रक्कम धनादेशाने पाठवावी. धनादेश (चेक) ''विद्या प्रसारक मंडळ A/c दिशा'' या नावाने पाठवावा.

**वार्षिक वर्गणी रु. २५०/-**

अंकाची किरकोळ
विक्रीची किंमत रु. २५/- फक्त.

वर्गणी पाठविताना आपला पूर्ण पत्ता, पिन कोड व दूरध्वनी कळवावा.

# संत श्रेष्ठ बहिणाबाई

संतांच्या जीवन चरित्रांच्या परिचय मालेतील हा पुढचा लेख - संपादक

**संत परंपरा :**

महाराष्ट्रात संत परंपरा थोर आहे. त्या परंपरेने कित्येक शतके वैष्णव धर्माची पताका उंच उभारून धरली आहे. या संत परंपरेत पुरुष संताबरोबर स्त्रीसंतानी ही भक्तिमार्गात मोठी मोलाची भर घातली आहे. संत ज्ञानेश्वराची बहीण मुक्ताबाई यांची योग्यता फार मोठी आहे. तिच्याबद्दल कवयित्री बहिणाबाई म्हणतात-

माझी मुक्ताई मुक्ताई। दहा वर्षीचे लेकरू।
चांगदेव योगीयाने तिला मानले रे गुरु।

१४०० वर्षे तप करून अखेर मुक्ताबाईच्या गुरुत्वात चांगदेव पावन झाले ही मुक्ताबाईची थोरवी.

नामदेवांची दासी जनी हिचा अधिकारही मोठा आहे. प्रत्यक्ष पांडुरंग तिच्या कामात तिला मदत करीत असे. ती अभंगरुपाने सर्व भक्तांना सुपरिचित आहे. संत सखू, संत चोखामेळा, त्यांची पत्नी संत सोयराबाई, समर्थशिष्या वेणाबाई आणि संत तुकोबारायाची शिष्या संतश्रेष्ठ बहिणाबाई. या सर्व महिला संतांनी भक्ती मार्गात आपला कायमचा ठसा उमटविला आहे.

**पूर्वसुकृत असल्यास :**

संत होण्याची ओढ लागण्यासाठी अनेक जन्मांची पूर्व पुण्याई गाठीशी असावी लागते. आणि संत पदवीपर्यंत पोहोचण्यासाठी जीवन एक कठोर तपश्चर्या म्हणून जगावे लागते. इतकी आपली तयारी झाल्यानंतरच सद्गुरूची भेट होऊ शकते. त्याच्याबद्दल तितकीच तीव्र ओढ लागलेली असल्यास त्याची कृपा होते आणि या कृपेनंतरचे जीवन म्हणजे असिधारा व्रतच. तलवारीच्या धारेवरचा खडतर प्रवास. तरच ती व्यक्ती संत पदवीला पोहोचते.

मुळात गुरुकृपा होण्याचा योग तेव्हाच संभवतो, जेव्हा साऱ्या विकारवश करणाऱ्या षट्रिंपासून मानव बराचसा मुक्त होतो. गुरु कृपेने शुद्ध मन, शुद्ध चरित्र होत जाण्यासाठी ज्या परीक्षा नियतीने योजलेल्या असतात, त्या साऱ्या कसोटीतून पार पडण्याचे अग्निदिव्य साधकाला करावे लागते. गुरुकृपेने यासाठी मदत प्राप्त होते. सारे दु:ख सुखात परिवर्तित करण्याचे सामर्थ्य गुरुकृपेत आहे हा विश्वास असतो. ही साक्ष संत श्रेष्ठ बहिणाबाईच्या जीवनावरून पटते.

शके १५५७ ते आश्विन शुद्ध प्रतिपदा शके १६२२ पर्यंत संत श्रेष्ठ बहिणाबाईचा काळ आहे. श्री संत तुकाराम महाराजांचे गुरुपण लाभण्याचा महन् मंगल योग या योगिनीच्या जीवनात होता. त्यामुळे तिचे जीवन धन्य झाले. आपल्या काव्य रचनेत शक, मिती, गुरुपरंपरा, आई वडिलांची माहिती संत बहिणाबाईनी अत्यंत रसाळ भाषेत सुमारे ७८ अभंगात देतात किंबहुना आपले बहुतेक आत्मचरित्र त्यांनी कथन केले आहे.

**जीवन चरित्र :**

त्यांच्या अभंगावरून बहिणाबाईंचा जन्म वेरूळ जवळ असलेल्या देवगावी झाला. वडिलांचे नांव आवजी कुलकर्णी व मातेचे नाव जानकीबाई असे होते. वयाच्या पांचव्या वर्षी तिचा विवाह पांच कोसावर राहणाऱ्या ३५ वर्षे वयाच्या रत्नाकर पाठक या बिजवाशी झाला. लग्नानंतर

चार पाच वर्षात वडिलांचेवर भाऊबंदकीमुळे घोर प्रसंग आला. त्यावेळी जावयास बोलावून मदतीची याचना केली. जावयाने सासऱ्याचे देणे फेडून टाकले. त्या सर्व मंडळीना गावाबाहेर काढले. पुढे सर्वच कुटुंब तीर्थयात्रा करीत निघाले. प्रवरा संगम, नीरा नरसिंगपूर, पंढरपूर, शिंगणापूर वगैरे क्षेत्रांच्या ठिकाणी थोडा थोडा मुक्काम करीत सर्व मंडळी दक्षिण काशी कोल्हापूर येथे येऊन स्थायिक झाली.

**कोल्हापूरातील घटना :**

त्यावेळी कोल्हापूर येथे प्रख्यात संत जयराम स्वामी वडगांवकर यांचा मुक्काम होता. आई वडिलांबरोबर बहिणाबाई स्वामींच्या कीर्तनास जाऊ लागली. ती कीर्तनात रंगू लागली. लहानपणापासूनच तिची प्रवृत्ती भगवद् भक्ती कडेच होती. बहिणाबाईची निष्ठा ओळखून तिला बोलवून स्वामीनी उपदेश केला. आत्मविवेचनात बहिणा म्हणते -

आवडीचा हेत पूर्वीण संस्कार। श्रवणीआदर कीर्तनाचा।

वयाच्या ९ व्या वर्षी लाभलेली देव प्रीतीची ओढ सांगताना बहिणा म्हणते -

वाटे मनामाजी रहावे येथेची। परिप्राक्तनाची दशा नाही।
जीव निवो परि पंढरीचे स्थळ। न संडावे जल ऐसे वाटे।

बहिणाबाईंच्या जीवनात गोवत्साची कथा मोठी विस्मय-जनक आहे. थोडक्यात ती कथा अशी आहे.

बहिणाबाईचे कुटुंब कोल्हापुरात बहिरंभटाच्या वाड्यात होते. बहिरंभटाला कोण्या एका ब्राह्मणाने एक सवत्स कपिलागाय दान म्हणून दिली. काही दिवसांनी बहिरंभटाना स्वप्नात आदेश झाल्याने ती गाय त्यांनी रत्नाकर पाठक याना अर्पण केली. बहिणाबाईला तिच्या वासराचे वेड लागले. ते बहिणाबाईला सोडेनासे झाले. आत्मनिवेदनात बहिणा म्हणते -

ऐसे नानापरी वत्स ते न सोडी। मलाहि आवडी तयापाशी।
न देखता वत्स चित्त तळमळी। जलाविन मासोळी तैसे वाटे।
जेथ माय संगे मी ही जाय तेथ। वत्सही तेथे सवे चाले।
आरती जालिया नमस्कार होती। आपणहि क्षिती ठेवी डोके।

एकदा एकादशीच्या दिवशी स्वामींच्या कथा श्रवण करण्यास बहिणाबाई समवेत वासरूही जाऊन बसले. खूप गर्दी झाल्याने लोकांना बसावयास जागा कमी पडू लागली. लोकांनी त्या वासराला ओढून बाहेर काढले. बहिणाबाईस रडे फुटले. गलबला ऐकून स्वामीपर्यंत बातमी गेली. त्यांनी त्या वासरास गौरव पूर्वक कथेत परत बोलविले. या घटनेबद्दल बहिणा म्हणते -

साक्ष अंतरीचा तो जयराम। वत्स अंतर्याम ओळखीले।
म्हणे त्यासी आणा वत्साचे अंतरी। काय नाही हरी आत्मवेत्ता।

हा सारा प्रकार कौतुकाने कोणा एका बाईने बहिणाबाईच्या भ्रताराला कथन केला. वासराचे वृत्तांत, बहिणाबाईचे रडणे, स्वामीने प्रेमाने कुरवाळून दिलेला शुभाशीर्वाद याचा परिणाम त्याच्यावर विपरीत झाला. बहिणा म्हणते -

जातीचा भिक्षुक। अंतरीबहु राग। धावला सवेग गेहा प्रती।
धरूनिया वेणी मारिले यथेष्ट। सर्वालागी कष्ट फार झाले।
अकरावे वरुष होते मज तेव्हा। काय पतिसेवा अंतरिले।
आले मन तेव्हा मारिले बळकट। बांधोनिया मोट टाकियेली।
तयावरी वत्स गाय दोघेजण। न खातीतृण जलासही। देखोनी वत्सासी गायीचा वृत्तांत। मोट तो सोडित ते वेळी। आणिले जवळी गाय वत्सापाशी। हुंबरली जैसी पुत्रमाता।

हा सारा विषय चर्चेचा झाला. ही गोष्ट स्वामींनाही कळली. अन्नपाणी वर्ज करून बसलेले गाय वासरू पहायला सारा गाव लोटला. जयरामस्वामी देखील तेथे आले. बहिणा म्हणते -

मिळोनिया लोक पाहती लोचनी। स्वामी ते क्षणी आनंदले।
म्हणती ब्राह्मण तू इचाभ्रतार। सांगतो निर्धार ऐक आता।
योगभ्रष्ट इची साधने बळकट। तू इसी कष्ट करू नको।

स्वधर्मेचि तुझी करील ही सेवा। उद्धरलि जीवा आपुलीया।
गाय आणि वत्स हे इचे सांगाती। अनुष्ठाती होती ऐक्य भाळ।
हेच इचे गुरु हे इचे साधन। तोडील बंधन आपुले हे।
इचे समागमे करिती जे वास। ते ही भक्तिरस येती सुख।

असा उपदेश करून जयराम स्वामी स्वस्थानी गेले.

द्वादशी संपत होती त्रयोदशीच्या आत वासराचा देहान्त जवळ आला. बहिरंभटाने मूकं करोति वाचालं या श्लोकाचा पूर्वार्ध म्हटला वत्साने उत्तरार्ध पूर्ण केला. तत् कृपा तमहं वन्दे। तत् कृपा तमहंवन्दे बोले शद्ब। श्लोक उत्तरार्ध वत्स बोले। असे म्हणत वासराने देह ठेविला. त्या दु:खाने बहिणाबाईचे भान हरपले. सर्व साधुसंतानी कीर्तन करीत वत्साला पुरले. गाय हंबरत होती. ती माझ्याकडे आली. मी चार दिवस विषण्ण होते. असे दिवस गेले -

प्रतिपदे माझारी पुण्यरात्री। बोलिला ब्राह्मण सन्मुख।
सावध विवेक धरी बाई। सावध सावध सावध तू मनी।
श्रवणी ऐकोनी देह कापे। तेथोनिया मन करोनि सावध।
स्मरणी स्वता सिद्ध चित्त केले। बहिणी म्हणे देह सर्वही देह विकल।
परि ते निश्चळ चित माझे। उघडोनी नेत्र पाहे जन पुढे।
नव दृष्टी पडे पांडुरंगा।

कार्तिकात वद्य पंचमी रविवार। स्वप्नीचा विचार गुरुकृपा।
आनंदले मन चिद्रूपी कोंदले। उठोनी बैसले चमत्कारे।
मंत्र आठविती तुकोबा स्वरूपा। स्वप्नामाजी कृपा पूर्ण केली।
बहिणी म्हणे ऐसी सद्गुरूची कृपा। तुकारामे यासे पूर्ण केली।

अशा विविध तापाने पोळलेल्या बहिणाबाईंच्या हळव्या जीवाला स्वप्नात तुकारामांचा गुरुकृपेचा लाभ होऊन अक्षरश: अमृत वर्षावाने शांतवन लाभले. या महन् मंगल क्षणाने तिच्या जीवनाचा सर्वस्वी काया पालट झाला. बहिणा अभंगात म्हणते -

भच्वा जैसा जळावाचोनी तडफडी। तैसीच आवडी तुकोबाची।
अंतरीच्या साक्षी असोजो प्राणी। अनुभवी मनी जाणेल तो।
तृषिनास जैसे आवडे जीवन। तैसा पिंड प्राणावीण दया।
बहिणी म्हणे - हेच तुकोबाचे पायी। ऐकोनिया देही पदे त्यांची।

एका सत् शिष्याने केलेला तुकोबा रायांसारख्या सद्गुरूचा हा फार मोठा सन्मान आहे. तो अभंग असा -

पांडुरंग तुका पांडुरंग तुका। वेगळीक देखा होय कथी।
कलियुगी बौद्ध रूप घरी हरी। तुकोबा शरीरी प्रवेशिला।
तुकोबाची बुद्धी पांडुरंग स्वरूप। मन ते स्वरूप तुकोबाचे।
तुकोबाचे नेत्र देही पांडुरंग। श्रोतृ ते अभंग रूप त्याचे।
तुकोबाचे हात लिहितात जेजे। तेचि ते सहजे पांडुरंगे।

तुकोबाचे याहून उत्कृष्ट वर्णन वा ओळख काय असू शकेल? तुकोबारायांचे हे शिवस्वरूप दर्शन आहे.

**गुरूकृपेनंतर :**

गुरूकृपेने दंग झालेली बहिणाबाई त्यातच दंग झाली. ती गाईचे दूध सेवन करी व गुरूचरणी तल्लीन होई. जयराम स्वामींना बोलावून बहिरंभटाने सर्व वृत्तांत कथन केला. ती बहिणाबाईची भाव समाधी पाहून स्वामींचा कंठ आनंदाने गहिवरून आला. संत हृदयाची ओढ संत हृदयाला सहजपणे पटते. आपली मातृकृपेची प्रेमळ दृष्टी बहिणाबाईवर टाकून जयरामस्वामी स्वस्थानी गेले. परंतु पतिदेव मात्र रूष्ट झाले. लोकांना हिज विषयी इतके प्रेम इतके कौतुक का वाटते हे सहन न होऊन मत्सराने तिच्या देहाला पीडा देण्यास सुरुवात केली. ही मरत का नाही इतका त्याचा क्रोध अनावर होत असे. बहिणा म्हणते -

भ्रतार म्हणे आम्ही की ब्राह्मण। वेदाचे पठण सदा करू।
कैचा शूद्र तुका स्वप्नीचे दर्शनी। बिघडली पत्नी काय करू।
कैचा जयराम कैचा पांडुरंग। माझा झाला भंग आश्रमाचा।

सारे लोक हिच्याशी बोलतात. मी तर हिच्या पुढे तुछ. तेव्हा इथे राहून काय करावयाचे.

वयाच्या पांचव्या वर्षापासून ज्या पतिदेवाची जन्मगाठ

पडली त्याच्या मनातला हा विचार बहिणाबाईला दु:सह वाटला. स्वधर्म आपूला रक्षूनिया मने। शास्त्राच्या श्रवणे देव साधू। भ्रताराची सेवा तोच आम्हा देव। भ्रतार स्वयमेव परब्रह्म। परंतु भावहीन वेदशास्त्र संपन्न भिक्षुकाला हे पटावे कसे. जिथे मानवी उपाय हरतात तिथे दैवी शक्ती मदतीला येते व भक्ताचे रक्षण करते.

पतिदेवाना एक विचित्र प्रकारचे दुखणे झाले. सर्व अंगाचा अतोनात दाह होऊ लागला. तो कशानेही शमेना. शरीर तापाने पोळल्यामुळे पतिदेवाच्या मनात उपरतीचे विचार येऊ लागले. अखेर एक वृद्ध ब्राह्मण आला. त्याने रत्नाकर पाठकाची समजूत घातली. तू तुझ्या स्त्रीचा त्याग कोणत्या अवगुणासाठी केलास. पतिदेवाने त्याला सारा वृत्तांत कथन केला व ब्राह्मणाकडे क्षमा याचना केली. त्याचेपासून वाचविण्याची विनंती केली. मी या पुढे स्त्रीला पीडा देणार नाही. परमेश्वराला भावभक्तीने शरण जाईन अशी करूणा भाकली. आशीर्वाद देऊन तो वृद्ध ब्राह्मण निघून गेला.

रत्नाकरची व्यथा दूर झाली. ब्राह्मणाच्या वेषात येवून देवानेच आपल्याला मार्गदर्शन केले. त्यांनी तुकोबारायांच्या दर्शनासाठी जावयाचे ठरविले. अशा रीतीने पतीसह गुरुच्या दर्शनासाठी जाण्याचा महान योग बहिणाबाईच्या जीवनात आला. सर्वात पुढे ती कपिला गाय धावत होती. इंद्रायणीत स्नान करून सर्व कुटुंब पांडुरंगाच्या भेटीस निघाले. अंतरंग आनंदाने भरून गेले. तेथे तुकोबाराय आरती करण्यात दंग होते. स्वप्नात पाहिले ते हेच होत, ही बहिणाबाईंची खात्री झाली. त्यांना पाहून डोळ्याचे पारणे फिटले. पति देवानेही भावपूर्ण अंत:करणाने दंडवत घातले. भक्तिरसाच्या आनंदात डुंबण्याचा पर्वकाळ पूर्णपुण्याईच्या योगे बहिणाबाईंच्या जीवनात येऊन ठेपला.

नित्य हरिकथा होतसे देऊळी। तुकोबा माऊली वैष्णवाची। तुकोबांची यथावेदातील अर्थ। पावे माझे चित्त समाधान। तुकोबाचे ध्यान पूर्वी कोल्हापूरी। जे स्वप्नामाझी देखियले। ते चि ध्यान डोळा देखोनी प्रत्यक्ष। आनंदी लोचन हेलावत। रात्रंदिन निद्रा न ये तिलभरी। तुकोबा अंतरी प्रवेशला। बहिणी म्हणे येती सुखाचे डोळावे। जाणती अनुभवे जाणते जे।

**श्री तुकारामांचे वैशिष्ट्य :**

श्री तुकारामांची अभंगवाणी हा एक अथांग सागर आहे. तुकोबारायासारखे संत हे स्वत: परिसासारखे असतात. ज्या जीवाला त्यांचा कृपा स्पर्श होतो त्या जीवाचे सोने होऊन जाते. त्या सोन्यातही परिसाचे गुण सामावलेले असतात. हे थोर माणसाचे लक्षण मानावयास पाहिजे, की तत्काळ शिष्याला ते आपल्या योग्यतेचे करतात.

**मंबाजीचा दुष्टपणा :**

त्याच गावात मंबाजी गोस्वामी नावाचा ब्राह्मण राहात होता. त्याने पत्नीसह आपला अनुग्रहीत होण्यासाठी रत्नाकर पाठकास आग्रह केला. आपण पूर्वीच अनुग्रहीत आहोत असे पाठकानी त्याला सांगितले. त्या ब्राह्मणाला याचा राग आला आणि त्याने पाठकांचा छळ मांडला. पुण्यात राहणाऱ्या प्रख्यात राजयोग्याकडे (अप्पाजी गोस्वामी) या बद्दल मंबाजीने कळविले व अन्यायाची दाद मागितली. बहिणाबाई निश्चितपणे देवाला आळवीत राहिल्या. कपिला गाईला त्या दुष्टाने दाव्याला बांधून घातली आणि येथेच सोट्याने बडवून काढले. तिला तीन दिवस तशीच उपाशी ठेविली. त्या माराचे वळ तुकारामांच्या पाठीवर उठले. गाय तुकोबाचा धावा करीत होती. गाय बांधून ठेविली होती. ती जागा अकस्मात आगीने पेटली. लोकानी धावत जाऊन ती आग विझवली. तिथे त्याना गाय बसलेली आढळली. तिच्या पाठीवर माराचे वळ उठले होते.

एवढी प्रचीती आल्यानंतर मंबाजीना श्रीतुकोबांची थोरवी पटली. हे सारे प्राक्तनाचे सुख दु:खाचे आघात प्रत्याघात सोसत बहिणाबाईंचा प्रवास चालू होता.

तुकारामांच्या कृपा स्पर्शाने तिचे जीवन पावन झाले होते. संसारही चालू होता. बहिणा म्हणते -

तुटले संचित झाले शुद्ध चित्त। अंतरीचा हेत ओळखिला। कृपा केली देवे इंद्रायणी तीरी। देहू ग्रामी थोर भक्तिपंथ। तेथे पांडुरंग देवाने देऊळ। राहावया स्थळ प्राप्त झाले। बहिणी म्हणे ऐसे भास झाले सात। अवघेचि संचित सरो आले।

अळी स्वत:ला एका कोशात कोंडून घेते आणि अखेरच्या रूपाचा ध्यास घेऊन असते. तिचे हळूहळू रूप पालटून फुलपाखरात रूपांतरित होते. संत बहिणाबाईचे जीवन असेच काही असावे. संत चरणरांचा ध्यास घेत बहिणा संतपदाला पोहोचली. गुरूकृपा लाभली. जीवनाचे सोने झाले. हृदयाकशात आनंद उचंबळला. अनुभव संपन्न काव्य जन्माला आले. आध्यात्मिक वैभव प्राप्त होऊन जीवनाचे सार्थक झाले.

तिची साधना उच्चपदाला पोहोचली. स्वत:च्या मृत्यूसमयी सर्वज्ञान होऊन मागच्या तेरा जन्मांचे स्मरण झाले. मृत्यूपूर्वी सुनेचा मृत्यू झाला. तिचे अस्थि विसर्जन करावयास गोदातीरी गेलेल्या पुत्राला तिने पत्राने कळविले. क्रिया-कर्मानंतर तू त्वरित परत ये. कारण मरणाची गुढी पुढे उभी आहे.

अंतरीची साक्ष जाणिले अंतरी। माय तू निर्धारी सद्गुरूही। देळिले स्वामी कचेश्वरी माये। विमान हे पाहे आले मज।

आईचे पत्र मिळताच विठ्ठल महाराज तातडीने आईकडे येण्यासाठी निघाले. ते आले तेव्हा लोक आनंदाने हरिनामाचा गजर करीत होते.

घटफुटलिया वरी। नभ नभाचे आंतरी।
जळ आटलिया जाण। प्रतिबिंब म्हणे कोण।

या संत स्त्रीने अमरत्व प्राप्त केले. अनेक स्त्रियांच्या भाव जीवनात कलह असतातच. परंतु आपल्याला नक्की कुठे पोचावयाचे आहे हे कळण्याचे भाग्य साऱ्यांनाच लाभलेले नसते. ते पूर्णपुण्याईमुळे बहिणाबाईना लाभले होते. हरिभक्तीच्या तीव्र ओढीतून त्यांना गुरूकृपेचा लाभ झाला. त्यामुळे सत्य असत्याची ओळख पटली. आणि सारे स्पष्ट झाले.

दुजियांचे दु:खे शिणे ज्याचे चित्त। तोचि एक संत ओळखावा। तेचि एक साधु तारतील जन। भ्रांतीसी हिरोन ज्ञान देती। बहिणी म्हणे भूत कृपा पूर्ण। तेचि वोळखण संत कृपा। संता असंताचे शरीरसारखे। भिन्नत्व ओळखे क्रियेपाशी। काच आणि मणी पाहता समान। अंतरीचा गुण भिन्न असे। बहिणी म्हणे भेद साधु ओळखून। पुढे त्याचे गुण अंगिकारी। जीवन मुक्ती जरी आत्मनिष्ठ। भक्ति प्रेम सुख दुर्लभ त्या। बहिणी म्हणे देव कृपा करी काही। तरीच ते ठायी पडे वर्म।

देवाचा आणि भक्ताचा भावसंबंध काही अपरूपच आहे. हा अधिकार भक्तश्रेष्ठ संत बहिणाबाईनी आपल्या भाव बळाने मिळविला होता. मराठीत आत्मचरित्र लिहिणारी बहिणाबाई ही पहिली संत कवयित्री होय. यामुळे तिच्या जीवनाचा इतिहास उपलब्ध होण्यास मदत झाली.

बहिणाबाईवर संतांच्या काव्यांचा फार मोठा परिणाम झालेला आहे. तुकाराम, जनाबाई, यांच्या अभंगांचा तिने अनुवाद केला आहे. बहिणाबाईंचे व्यक्तिमत्त्व हे विरळ व्यक्तिमत्त्व आहे. तिचे वैराग्य परिस्थितीजन्य नसून स्वभावात आहे. सुरुवातीला पतीचा विरोध झाला तरी पुढे तिच्या पतीने तुकारामांचे शिष्यत्व पत्करले. यात संत तुकारामांचा संतत्वाचा विजय आहे. तसेच बहिणाबाईच्या व्यक्तिमत्त्वाचाही विजय आहे. संत तुकारामांच्या निर्वाणापर्यंत ती देहूत राहू शकली यातही तिच्या निर्णायकतेचा विजय आहे.

आत्मवस्तुसंबंधी ती म्हणते -

पद्मपत्र जैसे डबकात असोन। लिप्त नव्हे जाण जेणेपरी।

तैसाचि तो आत्मा विश्वाकार भासे। ज्ञानियासि दीसे वेगळाची।

अशा रीतीने भक्तिपर ज्ञानपर करूणापर तिचे अभंग आहेत. एकाहून एक अनुभूती स्पर्श करणारे आहेत. देवाला मागणे मागताना बहिणा म्हणते -

मागता मागता जन्म गेले तेरा। परी फजीत खोरा तून देसी। देईन मी जीव तुझे पायी आजी। करावी तजवीजी होई तैसे। असोनिया देही हेचि दुःख वाटे। देईन कपाटे महाद्वारी। (दारे बंद करू नकोस) कोंडीत तुझा कारभार देवा। होईल हा देवा अनर्भासी।

**बहिणाबाईचे देवापाशी शेवटचे मागणे :**

निकाल आरती करू देवाधि देवा।
गाऊ नाचू करून कथा नित्य केशवा।
दिनरात्री छंद लागो हाचि मानसी।
रामाराम कृष्णा गाऊ गीतेसी।
सारासार विचार करू नित्य मानसी।
तत्वमसि गुरूमुख पाहू सकळिस।
संत संग करू आम्ही भावार्थ बळे।
बहिणी म्हणे येणे तुटती जन्ममरणमुळे।

**श्री. शं. बा. मठ**

६, कुमार आशिष, राम मारुती रोड,
ठाणे - ४०० ६०२.

दूरध्वनी : २५३५२०३०

●●●

## फक्त एक सेकंद

एका वर्षात किती सेकंद येतात? तुम्हाला माहीत आहे का? ३९५३६०००! एका सेकंदात कोणकोणत्या गोष्टी घडू शकतात पहा -

- सेकंद उच्चारायला एक सेकंद लागतो.
- सूर्य दर सेकंदाला स्वत:चे चाळीस लाख टन वस्तुमान कमी करतो.
- ध्वनी हवेच्या माध्यमातून प्रति सेकंद ३३० मीटर जातो. पाण्यातून दीड किमी. अंतर जातो.
- प्रकाश किरण पृथ्वीला सात प्रदक्षिणा घालतात.
- चंद्रप्रकाश पृथ्वीवर पोहोचण्यास एका सेकंदापेक्षा किंचित जास्त वेळ लागतो.
- प्रकाशकिरण सेकंदाला तीन लाख किलो मीटर अंतर जाऊ शकतो.

---

- नवीन दिवस उगवेल, त्याला हसून सामोरे जा.
- सर्वत्र अंधार पसरेल. घाबरू नका. दिव्याची ज्योत पेटवा.
- संकटे चालून येतील. धैर्याने तोंड द्या.
- काही अवघड वाटेल, कसेही करून ते तडीस न्या.
- कठीण वेळ येईल, वज्रासारखे कठीण व्हा.
- एखादा संकटात असेल त्याला मार्ग शोधण्यास मदत करा.
- एखाद्याला वेदना होत असतील, मदतीला धावून जा.
- मित्र-मैत्रिणी व्यथित असतील, त्यांना आधार द्या.
- दिवस संपतेवेळी, सत्कृत्य केले म्हणून कृतार्थ व्हा.

# भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना

*माननीय यशवंत साने यांच्या या लेखाचा पूर्वार्ध ऑक्टोबरच्या अंकात देण्यात आला होता. त्याचा उर्वरित भाग येथे देत आहोत - संपादक*

उत्तरार्ध -

**Stuctural Determinism and Structural Coupling.**

Accorching to the principle of structural determinism, the actual course of change in an living entity is controlled by its structure rather than direct influence of its enviornment.

a) Recognise that your reality is not changed by external things in order to get to the internal things.

Your reality is changed by changing the internal things which then affects external things

b) we cannot see outside what we are not inside.

c) We can understand only as much of the world as we have developed and realised within ourselves.

d) Adjust the microcosom-which is in your power to do, and the macrocosom will adjust itself for you.

e) Spiritual unfolding 0f the universe is a co-operative process in which all living creatures take part, each according to his/her individual uniqueness and stage of evolution.

f) As you rise and are true, you lift whole world with you; for as you tread the path, it becomes plainer for those who are coming.

g) Living things are cognitive systems and living is a process of cognition

स्वरूपाच्या रचनेतील पूर्वनिश्चितता आणि त्यांची जोडणी.

अ) ह्या तत्त्वाप्रमाणे कोणत्याही जीवाच्या स्थितीमधील बदल हा त्याच्या स्वस्वरूपाच्या रचनेवर अवलंबून व नियमित असतो त्याच्यावर पडणाऱ्या बाह्य वातावरणावर नव्हे.

ब) एक जाणीव ठेवणे आवश्यक आहे. तुमचे वास्तव अस्तित्व हे बहीर्गत गोष्टी अंतरंगात बदल करीत असल्यामुळे बदलत नसते, तर, तुमच्या अंतर्गत गोष्टींमध्ये बदल घडवल्यामुळे बाह्य गोष्टींमध्ये बदल घडत असतो.

क) बाह्य दृश्य हे आपण अंतरंगात कसे आहोत तसे दिसते.

ड) जगाचे वा सृष्टिचे ज्ञान एव्हढेंच व इतकेच होते, कीं ज्या प्रमाणात आपण आपल्यात अंतर्गत बदल वा सुधारणा करतो आणि अनुभूती प्राप्त करतो.

इ) अंतर्गत सूक्ष्मात स्वत:च्या सामर्थ्या बरहुकूम जेव्हढा बदल कराल तेव्हढ्या प्रमाणांत बाह्य जड विश्वात बदल घडेल.

ई) सगळ्या विश्वातील स्पिरीच्यूअल, आध्यात्मिक, पातळी उंचावण्याची क्रिया ही एक प्रत्येक जीवसृष्टील प्राण्याच्या जीवात्माच्या परस्पर सहकार्याची क्रिया होय, आणि त्यांत भाग घेणारे सगळे जीवात्मे आपआपल्या पातळीवर म्हणजे त्यांच्या उत्क्रांतितील अधिकार क्रमानुसार व स्वत:च्या व्यक्तीगत वैशिष्टपूर्ण स्थितीबरहुकूम भाग घेत असतात.

उ) जसजसा तुमचा स्वत:चा 'उद्धार' होतो व जितका तो खरा असतो तसतसा त्या प्रमाणातच सगळ्या जगाचाही उद्धार तुमच्याबरोबर होत असतो; कारण तुम्ही ज्या मार्गावर वा पथावर मार्गक्रमण करता तो मार्ग पाठीमागून येणाऱ्यांना सुकर व सोपा बनतो.

ऊ) जिवंत गोष्टी जीव मात्र हे सर्व 'बुद्धीआश्रित' यंत्रणा असतात आणि जगणे हा एक प्रकारचा 'बुद्धी योगच' आहे.

'पृथ्वीवरील आध्यात्मिक उत्क्रांती इतिहासाचे' हे अत्यंत वास्तव व महत्वाचे निरीक्षण आहे. स्पिरीच्यूअल सायन्स, आध्यात्मिक विज्ञानातील क्रियांचे नियम शोधण्याचा हा एक महत्वाचा प्रयत्न असे सर्टिफिकेट 'डिमीट्रॉव्ह, मातुराना व वारेला' ह्या तिघांना द्यावे लागेल. भारतीय संस्कृतीतील आध्यात्मिक चळवळीचा अभ्यास करणाऱ्यांना ह्या नियमांचा पडताळा घेतां येण्यासारखा आहे; आणि तो आपण क्रमाक्रमाने घेणारच आहोत. महत्वाची गोष्ट ही आहे कीं निदान सध्याच्या गोंधळलेल्या कांहीशा अज्ञानमूलक धार्मिक चळवळी, विश्वास व धडपड, ह्यामधील खऱ्या आध्यात्मिक उद्धाराला ह्या 'नियमांच्या प्रकाशात' वाट चालता येईल व भारतीय वैदिक संस्कृतीतील उच्च मूल्याप्रत स्वत:चा व जगाचा उद्धार करतां येणे शक्य होईल. आणि जर त्याचा प्रत्यक्षात पुरावा मिळाला तर मग त्यानंतर **ह्या नियमांचा कर्ता कोण व ह्या नियमांच्या तत्वांचा 'मूळ आधार' कोणता हा प्रश्न सहाजिकच पडेल. तसा तो प्रश्न पडला तर जीवात्म्याच्या आध्यात्मिक उंचीचे समीकरण हे त्यामुळे होणाऱ्या मानवी संस्कृतीतील बदलाचे उपादान आहे हे लक्षात येईल. त्याच क्षणी ह्या वैदिक बीजातील गूढ, गुप्त समीकरणाची जाणीव व बीज निर्माण करणाऱ्या ईश्वरी शक्तीचा परिचय होईल. हेच आहे ईश्वर दर्शन!!**

त्यानंतर ह्या त्रयी विचारवंतानी खालील गोष्टीची यंत्रणा मांडली.

**Intrapersonal Autopoiesis (Experiential dimension)**

1) **The self reproduction**

2) **The self realisation**

3) **The self evolvement**

The three streams of Intrapersonal Knowledge

1) **KAI** - Knowledge About the Ideal

2) **KAO** - The Knowledge About the Obstacles

3) **KAE** - The Knowledge About the Energy

4) **KES** - Human Experiential Space

**Dealing with Attractors Dynamics**

ते ह्या शेवटच्या मुद्यावर काय म्हणतात ते पहा.

"According to Ancient Vedic literature, people's actions are usually directed towards achievement or

1) Acquisition of power

2) Of knowledge and freedoom

3) Of experience of Love, Pleasures and Longevity.

Whatever an individual does, his or her actions are pulled towardsone (or more than one, in parallel) of the attractors.

**व्यक्तीगत जीवनाच्या प्रवासात पुढील कृती संभवतात :**

१) प्रजोत्पादन - मुले होणे - नवीन मानवी जीव जन्माला घालणे.

२) स्वत:च्या अस्तित्वाबद्दल जाणीव प्राप्त करणे

३) स्वत:चे व्यक्तिमत्व विकसित करणे

(KAI) स्वत:च्या आयुष्यात एखाद्या आदर्शाच्या प्राप्तीसाठी धडपड करणे

(KAO) ह्या प्रगतीला किंवा मार्गाला येणाऱ्या अडथळ्यांची माहिती मिळवणे.

(KAE) स्वत:च्या शक्तींची (बाह्य व अंतर्गत) ओळख करून घेणे

(HES) स्वत:च्या अनुभवांची बेगमी करणे - अनुभूती घेणे.

पण, ह्या धडपडीत ज्या काही शक्ती संकल्पनांचे आकर्षण त्याला जबरदस्त व नकळत सुद्धा जाणवणे किंवा त्याच्या जीवनावर प्रभाव गाजवते त्यांची वर्गवारी अशी आहे.

**1) Chaotic अनियंत्रित**

**2) Non- chaotic नियंत्रित, पक्की, निश्चित**

**कोणती ही आकर्षणे :**

१) कुठली तरी सत्ता प्राप्त करणे (राजकीय, सामाजिक, धार्मिक व आध्यात्मिक)

२) कुठल्या तरी प्रकारचे ज्ञान व स्वातंत्र्य मिळवणे (ज्ञान चरितार्थाचे, शास्त्राचे वगैरे) (स्वातंत्र्य राजकीय, वैयक्तिक आत्मस्वातंत्र्य)

३) प्रेम, सुख आणि दीर्घ जीवनाची लालसा

**पण, Non-chaotic मध्ये फक्त एक जबरदस्त गोष्ट आहे ती म्हणजे निश्चित मृत्यू. प्रत्येक जीव त्या अंतिम शेवटाकडे सतत, हळूहळू, क्रमाक्रमाने ओढला जातो. त्यापासून कोणालाही सुटका नाही. आणि हा बिंदू आला कीं ह्या जगातली आकर्षणे, अनुभव, अनुभूती, कार्य, ध्येये ह्यावर पडदा पडतो. मग जीवाची काहीही इच्छा वा प्रतिकार असला तरी!!**

आतां असे लक्षात येईल कीं जीवमात्रांची ही जीवनयात्रा ज्या आकर्षणांवर, चालते त्यांतील कांही वाटचाल जाणीवपूर्वक तर कांही अभावितपणे किंवा नैसर्गिकपणे चालते.

प्रत्येक जीव मग तो कितीही मोठ्ठा बुद्धीवान वा सामर्थ्यवान, प्रतिष्ठित असला तरी त्याला आपण ज्या जीवनपथावर चालतो, धडपडतो-सुखी किंवा दु:खी होतो त्याची पूर्ण ओळख वा जाणीव नसते. खरे तर ही आश्चर्याची बाब आहे. नाही कां?

त्यांतील कांही कृती तर केवळ नैसर्गिक रीत्या त्याच्याकडून निसर्गाच्या युक्तीने रचनेने राबवल्या जातात. त्यांतील प्रजोत्पादन, संसारसुख हे तर ऋषीमुनी व तत्वज्ञानी व वैज्ञानिकांना सुद्धा, 'या आकर्षणाचे आपण बळी पडतो', हे पूर्णपणे जाणवत नाही, त्यावर, त्यांचे पूर्ण प्रभूत्व नसते. मग, सामान्यांची काय कथा त्यामुले ऋषींनाही पत्नी व मुलेबाळे असतात. कां बरे? कारण, ह्या मानव बीजाची ती एक अत्यंत महत्वाची धारणा व निसर्गाचा प्लॅन आहे. विश्वामित्रासारख्या स्वतंत्र साधकाला संसारसूख लाथाडून 'ब्रह्मर्षि' ह्या आध्यात्मिक अधिकारासाठी जगावेगळा जबरदस्त व अथक प्रयत्न करतांना 'मोहिनी' सारख्या अप्सरेच्या मोहाला बळी पडण्याचा प्रसंग ओढवला याचे काय कारण असावे बरे?

**योगी अरविंद म्हणतात :**

**"Why is it difficult to conguer sex?**

(पान २७ वर)

# युरोपची तोंड ओळख

*सौ. सुनीता खरे यांच्या या प्रवास वर्णनाचा पूर्वार्ध आपण ऑक्टोबरच्या अंकात वाचला. उत्तरार्ध येथे देत आहोत - संपादक*

**उत्तरार्ध :**

ब्रुसेल्स हे बेल्जियमचे राजधानीचे ठिकाण. हीच युरोपिअन युनियनचीही राजधानी आहे. ग्रँट प्लेस ही ह्या शहरांतील मध्यवर्ती वसती. १२ व्या शतकापासून व्यापार, विविध सभा व कार्यक्रम यांसाठी ग्रँड प्लेस प्रसिद्ध आहे. ग्रँड प्लेसपासून दोन चौक ओलांडून गेले की आपण मानेकन पिस् (Mannekan Pis) ह्या जगप्रसिद्ध शिल्पापाशी पोहोचतो. हा एका बालकाचा ब्राँझमध्ये बनविलेला एक पुतळा असून तो ब्रुसेलसची ओळख असल्याचे मानले जाते. हा पुतळा नक्की कोणी व केव्हा बनविला, याची माहिती नीटशी उपलब्ध नाही. पूर्वी एका राजाचा छोटा मुलगा हरवला. एका भिकाऱ्याला तो राजवाड्याच्या मागे लघुशंका करीत असलेला सापडला. त्याचेच हे शिल्प. ब्रुसेल्सवासियांचा तो अत्यंत लाडका असून वेगवेगळ्या सणांच्या दिवशी त्याला वेगवेगळे कपडे घालून सजविले जाते. त्याच्या कपड्यांचे एक प्रदर्शन असून त्याचेवर अनेक कथा लिहिल्या गेल्या आहेत.

'ऑटोमियम' ही ब्रुसेल्सची दुसरी खूण. १९५८ च्या जागतिक प्रदर्शनाच्या वेळी हा ३३५ फूट उंचीचा मनोरा उभारण्यात आला. ही स्फटिकाच्या अणूची प्रतिकृती आहे.

ऑटोमियम पाहून आम्ही ॲमस्टरडमकडे रवाना झालो. संध्याकाळी ६.३० वाजता रोटरडॅम येथील पवनचक्क्या दिसू लागल्या. डॅम म्हणजे चौक. म्हणून रोटरडॅम म्हणजे रॉटरनदीवरील चौक. रॉटरडॅम हे जगातील दुसऱ्या क्रमाकाचे बंदर आहे.

ॲमस्टरडम ही बेल्जियम (हॉलंड) ची राजधानी आहे. येथे हजारोंच्या संख्येने सायकली वापरल्या जातात. रस्त्यांवर सायकलींसाठी स्वतंत्र लेन असून जागोजागी सायकल स्टँण्डस् दिसतात. इमर्जन्सी व्हेहिकल्स म्हणजे पोलिस व्हॅन, फायरब्रिगेड व्हॅन्स, हॉस्पिटल व्हॅन्स इ. साठी युरोपिअन महामार्गावर स्वतंत्र लेन असते आणि विशेष म्हणजे तीवरून इतर कोणतेही वाहन केव्हाही जात नाही.

**हॉलंड :**

हॉलंड हा समुद्र सपाटीच्या खाली असलेला देश आहे असे शालेय शिक्षणाच्या वयात वाचले होते. त्यामुळे हा देश पहाण्याची मोठी उत्सुकता होती. डच लोकांनी ह्या समुद्री आपत्तीला कसे तोंड दिले ते पहायचे होते. ह्या देशांतील निम्मी भूमी डचांनी समुद्राला मागे हरवून संपादन केलेली असून देवाने जग निर्माण केले असले तरी हॉलंड डच लोकांनी निर्माण केले असा सार्थ अभिमान डचांना आहे. ही जमीन पुन्हा समुद्रार्पण होऊ नये, म्हणून बेल्जियन लोक अथक प्रयत्न करीत असतात. त्यांनी पवनचक्क्यांचा उपयोग करून पाणी ओढून आणि मोठमोठे बंधारे बांधून कालवे काढून ह्या प्रश्नावर तोडगा काढला. त्यामुळे आता येथील समुद्र भूमीच्या पातळीच्या वर नसून ॲमस्टरडॅम आता समुद्रपातळीवर आहे. तेथे आता भरती ओहोटी यांचा त्रास कधीही होत नाही. संपूर्ण समुद्र अगस्ती ऋषींनी प्राशन केल्याची गोष्ट आपल्या पुराणात आहे. समुद्राचे पाणी ओढून घेऊन त्याला आवश्यक ती दिशा देणारे डच हे आधुनिक अगस्तीच आहेत असे म्हटले पाहिजे. संपूर्ण रस्त्यांबरोबर कालव्यांमधूनही वाहतूक होत असते.

ॲमस्टरडम आणि व्हेनिस ह्या दोन शहरांची तुलना बऱ्याचदा केली जाते. दोन्हीतील फरक असा की व्हेनिस हे असंख्य कालव्यांच्या काठी वसलेले शहर आहे व तेथील संपूर्ण वाहतूक जलमार्गे होते. तेथे मात्र रस्त्यांवरही वाहतूक असते, रेल्वे वाहतूक आहे व जोडीला जलमार्गे वाहतूक आहे. १७ व्या शतकामध्ये ह्या कालव्यांच्या तीरावर सौंदर्यपूर्ण इमारती बांधल्या. ह्या कालव्यांवर ठिकठिकाणी आर्च ब्रिजेस बांधलेले आहेत. ह्यामुळेच कॅनॉल क्रूझची सफर हा ह्या शहराची ओळख करून घेण्याचा चांगला मार्ग आहे.


हिरे व्यापारासाठी ॲमस्टरडम प्रसिद्ध आहे. येथे डायमंड कटिंग व पॉलिशिंगच्या फॅक्टऱ्या आहेत. खाणींतून आलेले हिरे कापून व तासून कसे घेतात, त्यांना पैलू कसे पाडतात, त्यांचा दर्जा व किंमत कशी ठरवितात इ. सर्व माहिती येथे दिली जाते. खरेदीही करता येते. विविध प्रकारचे मिळणारे चीझ ही ही ॲमस्टरडमची खासियत आहे.

शहरांत आता नव्याने बांधकाम करण्यास परवानगी दिली जात नाही; त्यामुळे येथे लोक कॅनॉलमध्ये बोट घेऊन रहातात. बोटीत वीज घेण्यासाठी त्यांना विशेष परवाना घ्यावा लागतो व पिण्यासाठी पाणी विकत घ्यावे लागते. अशा सुमारे ५०० हाऊस बोटस् सध्या येथे क्रूझची सफर करीत असताना दिसतात.

ॲमस्टरडम येथील इमारतीचे जिने अत्यंत अरुंद असतात. त्यामुळे सामानाची हलवाहलव त्यावरून करता येत नाही. ह्या कामासाठी इमारतीच्या वरच्या बाजूला प्रत्येक ब्लॉकसाठी मोठमोठे हूक टांगलेले आहेत. रस्त्यावरून ब्लॉकपर्यंत शिड्या लावून सामान हलविले जाते.

**ट्युलिपच्या बागा :**

**कुकेन हॉफ गार्डन्स** ह्या ट्युलिपच्या बागा हे हॉलंडमधील एक प्रमुख आकर्षण आहे. दुरून गुलाबासारखी वाटणारी ही विविध रंगी फुले युरोपांत शिरल्यापासून लक्ष वेधून घेत होती. येथील गार्डन्समध्ये ह्या फुलांचे पीक मोठ्या प्रमाणावर घेतले जाते. मार्च अखेर ते मे चा मध्य हा त्यांचा मोसम असतो. ह्या ट्युलिपच्या विस्तीर्ण बागा आणि त्यामधील विविध रंगांची फुले हे अगदी डोळ्यांचे पारणे फेडणारे देखणे दृश्य असते.



**कुकेन हॉफ गार्डन (ट्युलिपची बाग)**



**ट्युलिपच्या बागा ह्या अशा विस्तृत आहेत**

ॲमस्टरडमपासून काही अंतरावर झान नदीच्या काठावर झांसेशान हे छोटेसे गाव वसलेले आहे. येथील पवनचक्क्या आजही चालू स्थितीत आहेत त्यामुळे हॉलंडची भेट सुफळ संपूर्ण झाल्याचे समाधान येथे मिळते. येथे एक चीज फॅक्टरी व एक लाकडी बुटांचा कारखाना आहे. हे कारखाने पहाण्यासाठी त्यांच्या आवारांत शिरताना एक विशेष गोष्ट नजरेस आली. आम्ही फॅक्टरीच्या

प्रवेशद्वारातून आत शिरत असताना एक फोटोग्राफर त्याचा कॅमरा सज्ज ठेवून आत येणाऱ्या प्रत्येकाचा फोटो काढत होता. त्याची ती कमीत कमी वेळात जास्तीत जास्त धंदा करण्याची कल्पकता व लगबग पाहून मला त्याचे कौतुक वाटले आणि हसू आले. गंमत म्हणजे त्या हसणाऱ्या मुद्रेंतच त्याने झटकन माझा फोटो काढला. सुमारे ४०/४५ मिनिटांनी आम्ही चीझची व बुटांची दोन्ही फॅक्टऱ्या बघून बाहेर पडतो तोच ते सर्व फोटो त्याने प्रवाशांच्या राष्ट्रीयत्वानुसार वेगवेगळे करून एका मोठ्या बोर्डावर सुंदर तऱ्हेने लावले होते. हे सर्व फोटो एवढे सुंदर निघाले होत की प्रत्येक फोटोचे ५-५ युरो (म्हणजे सुमारे २७५रु.) एवढे मूल्य देऊन आमच्यापैकी कितीतरी लोकांनी ते खरेदी केले. माणसाने धंदा करावा तर अशा पोटतिडिकेने.

एंजेलबर्गला आमचा मुक्काम 'हॉटेल टेरेस' येथे होता. खोलीच्या खिडकीतून माउंट टिटलीसची बर्फाच्छादित शिखरे दिसत होती. हे हॉटेल एका डोंगराच्या माथ्यावर असून डोंगरपायथ्याशी बसमधून उतरल्यानंतर वर हॉटेलात जाण्यासाठी एक ट्रामसारखी रुळांवरून वरखाली जाणारी लिफ्ट होती. एक लिफ्ट खाली जाई व त्याचवेळी दुसरी वर येई.

**माऊंट टिटलीस :**

दुसऱ्या दिवशी माऊंट टिटलीस वर जाण्याचा कार्यक्रम होता. समोर माऊंट टिटलीस व त्यावर जाणाऱ्या ट्रॉलीज दिसत होत्या. बर्फाच्छादित शिखरे दिसत होती. जेथून ट्रॉलीज सुटतात त्या स्टेशनवर आलो. येथे ट्रॉलीज पूर्णपणे थांबत नाहीत. त्या हळूहळू पुढे सरकत असतानाच चपळाईने त्यात चढून बसावे लागते. एका ट्रॉलीत चारजण बसत. थोड्या अंतरावर मग तिचा उंच जाण्याचा मार्ग सुरु होई. एका ठरावीक उंचीवर ह्या ट्रॉलीतून उतरायचे. येथेही ती संपूर्ण थांबत नसेच. तेथून एकावेळी ४० माणसे वर जाऊ शकतील अशी मोठी लिफ्ट उपलब्ध होती. आम्ही तीमधून जात होतो तेव्हा तेथील तापमान ०° सेंटिग्रेट असल्याचे सांगण्यात आले. आम्ही १०,००० फूट उंचीवर आलो होतो. येथे पक्के बांधकाम केलेले आहे. कोणाला थंडीचा त्रास होऊ लागला तर वॉर्मरूमची सोय आहे. प्रवाशांचे लोंढेच्या लोंढे बर्फावर स्केटिंग, स्कीईंग करण्याच्या सामग्रीनिशी येत होते. आमच्या सारखे फक्त निसर्गदर्शनोत्सुकही बरेच होते. टेलिफोन, हॉटेलसह सर्व सुविधा उपलब्ध होत्या. विशेष म्हणजे केसरीने येथे चक्क गरमागरम पावभाजी, बटाटेवडा व डाळभात असा बेत आखला होता. त्या अत्यंत थंड अशा उंचावरील ठिकाणी ह्या गरमागरम अन्नब्रह्माच्या प्राप्तीने तमाम सहप्रवासी सुखावले.

परतीच्या वाटेवर आम्ही ल्यूसर्न लेकला भेट दिली. ह्या तलावात बोटिंगचा कार्यक्रम होता. बोटीतच संध्याकाळी ७ वाजता जेवण मिळणार होते. बाहेर थोडा पाऊस होता पण बोटीवर छप्पर असल्याने आम्ही मजेत होतो. पाऊस थांबल्यावर सुंदर इंद्रधनुष्य पडले. हे अत्यंत आनंददायी असे क्षण होते. आम्ही तलावांत बाजूने व वर काचा असलेल्या बोटीत, समोर अन्न आणि बाजूला स्वच्छ आकाशात स्पष्ट अशा इंद्रधनुष्याचे सप्तरंगी दर्शन.

**टॉप ऑफ युरोप :**

दुसऱ्या दिवशी **कॉग-व्हील ट्रेनने युंगफ्राओयु (टॉप ऑफ युरोप)** येथे जायचे होते. रेल्वे स्टेशनपर्यंत बसने जाऊन १०-४५ ची ट्रेन पकडली. ट्रेन डोंगरावर जाऊ लागली तसतसे दोन्ही बाजूस बर्फ दिसू लागले. अगदी हात बाहेर काढला तर हाती येईल अशा अंतरावर येथून पुढे सर्वत्र बर्फच बर्फ होते. गाडी तीन चारच डब्यांची, हिरव्या पिवळ्या रंगाची देखणी नॅरोगेज रेल्वे. नेरळ-माथेरान ह्या रेल्वे प्रवासाची आठवण करून देणारी आणि तरीही दुतर्फा असलेल्या बर्फाळ वातावरणामुळे स्वत:चे वेगळेपण दाखविणारी. मध्ये एकदा गाडी बदलून दुसऱ्या गाडीने



**टॉप ऑफ युरोपला नेणारी कॉगव्हील ट्रेन**

आम्ही युंगफ्राओयु ह्या टॉप ऑफ युरोप येथील रेल्वे स्टेशनवर उतरलो. ह्या ठिकाणाची उंची आहे १२,३८८ फूट. ह्या रेल्वेची उभारणी करतेवेळी ती ७ वर्षात पूर्ण होईल अशी अपेक्षा होती. प्रत्यक्षांत तांत्रिक अडचणी, साधनसामग्रीच्या पुरवठ्यातील अडथळे, प्रतिकूल नैसर्गिक परिस्थिती व हवामान यांच्यामुळे ह्या कामाला १६ वर्षे लागली. तोपर्यंत अपेक्षित १० कोटी स्विसफ्रँक्सचा खर्च १५ कोटी स्विसफ्रँक्स इतका वाढला होता. थंडीमध्ये येथे काम करणाऱ्यांचा इतर जगाशी संपर्क रहात नसे. त्यामुळे त्या कालावधीत त्यांना लागणाऱ्या अन्नाचाही आगाऊ साठा करून ठेवावा लागे. आज सीझनमध्ये दररोज ४००० पेक्षांही अधिक प्रवासी युंगफ्राओयुला भेट देतात. 'History and technology-science and research on the Jungfraujoch -Top of Europe' हवा शीर्षकाच्या तेथे उपलब्ध असलेल्या माहितीप्रत्रकानुसार इ.स. १९९५ मध्ये ४,७९,८५३ प्रवाशांनी येथे भेट दिल्याची नोंद असून प्रतिवर्षी येथे येणाऱ्या प्रवाशांची संख्या वाढत आहे. निसर्गाची किमया व मानवाची बुद्धी यांचा हा सुरेख संगम पाहून 'तेथे कर माझे जुळती' ही कविता ओठांवर आली.

येथे पर्यावरणविषयक संशोधन केन्द्र आहे. (स्फिंक्स ऑब्झर्वेटरी) येथे हवेच्या २५ मूलतत्त्वांचे (तपमान, वारे, हवेचा दाब इ.) येथे दर १० मिनिटांनी मापन केले जाते.

आइस पॅलेस नामक गुहेमध्ये अत्यंत सुंदर अशी स्फटिकाची बनविलेली पशुपक्षांची शिल्पे केलेली आहेत. येथे मला श्वसनाला थोडा त्रास होत होता, परंतु एका ठिकाणी जरा थांबून थोडे दीर्घश्वसन केल्यावर तो नाहीसा झाला. ह्या गुहेमधील तापमान होते उणे ८ सेंटिग्रेड. इतक्या कमी तापमानांतही अत्यंत आनंदमय अनुभव देणारा हा आमच्या आयुष्यांतील अविस्मरणीय दिवस होता. त्या आनंदावर कळस चढविला आमच्या येथील ग्रुप लीडरने. आशीष सोहोनी याने येथे दिलेल्या गरमागरम पुरी व गाजरहलवा अशा मेजवानीने बहार आणली.

**वडूज:**

स्वित्झर्लंड व ऑस्ट्रिया यांच्या सरहद्दीवर लिचेन्स्टाइन नावाच एक छोटासा देश आहे. उत्तर-दक्षिण २४.५ कि.मी आणि पूर्व - पश्चिम ९.४ कि.मी. एवढाच त्याचा विस्तार आहे. आमच्या तेथील गाईडने मोठ्या नावाचा छोटा देश अशीच स्वत:च्या देशाची ओळख करून दिली. ४ था चार्लस् ह्या रोमन सम्राटाने २३ जानेवारी १७१९ मध्ये हवा देशाची स्थापना केली. दुसऱ्या महायुद्धात हा देश तटस्थ राहिला. येथील बोलीभाषा जर्मन असून राजा हा येथील प्रशासकीय अधिकारी आहे. त्याची विधानसभा फक्त २५ जणांची असून देशाची लोकसंख्या ३४,००० आहे असे गाईडच्या सांगण्यावरून कळले. राजधानी आहे 'वडूज'. वडूज दर्शनार्थ म्हणून येथे ट्राममधून फेरफटका होता. सुंदर निळा रंग असलेल्या ह्या ट्रामच्या फेरफटक्यामध्ये वडूजचे दर्शन घडविले. तिकिट होते ५ युरो. वडूज हे अत्यंत निसर्गरम्य, टुमदार असे गाव आहे. ट्राम येते आहे हे कळल्यावर दोन गोजिरवाणी, गोरीपान, लाल लाल गाल असलेली मुले अच्छा करून हात हलवीत होती. आम्हीही त्यांना हात हलवून प्रतिसाद दिल्यावर इतकी प्रसन्न हसली. वडूजमध्ये बऱ्याच वाइनरीज आहेत. दंतवैद्यांना उपयोगी पडणारे पोर्सेलिन येथे बनते. स्विस करन्सी ही येथील करन्सी असून त्यांची स्वित्झार्लंडकडील

सीमा खुली आहे. २००६ हे त्यांचे देशाच्या स्वातंत्र्याची २०० वर्षे साजरी करण्याचे वर्ष होते. येथे सर्वांसाठी ८-८ युरो किंमतीचे व्हेज सँडविचेस आमच्या मॅनेजरने मागविले होते ते सर्वांना जेवण म्हणून वाटण्यात आले. त्यासोबत एक मिनरल वॉटरची बाटली. हे सँडविच इतके ताजे व मोठे होते की मी १ वाजता जेवणाच्या वेळी व दुपारी ४ वाजता असे दोन वेळा खाल्ले तरी ते संपविणे जडच वाटले.

जेवणानंतर वडूजहून निघून आम्ही ऑस्ट्रियाच्या हद्दीत शितलो. इन्स नदीच्या काठावरचे इन्सब्रुक हे आमचे मुक्कामाचे ठिकाण होते आणि मुक्कामाच्या हॉटेलचे नाव होते 'मारिया थेरेसा स्ट्रासे.' पूर्वी आपली संपन्नता प्रदर्शित करण्यासाठी येथे घरांवर सोन्याची कौले चढविली जात असत. हीच आज 'गोल्डन रुफ्स' म्हणून प्रसिद्ध असली तरी त्यातील बरीच कौले चोरीला गेलेली असून सोनेरी मुलाम्याच्या कौलांनी त्यांची जागा घेतलेली आहे. वॅटन येथील स्वारोवस्की क्रिस्टल म्युझियमला अम्ही भेट दिली. येथे खूप चांगले क्रिस्टल्स बनतात. क्रिस्टल्सचा वापर करून सुंदर सुंदर देखावे तयार केले आहेत.

२५ एप्रिल रोजी सकाळी इन्सब्रुकहून निघालो व दुपारी व्हेनिसला पोहोचलो. येथे भूमध्य सागरांतून व्हेनिस बेटापर्यंत बोटराईड होती. व्हेनिसमध्ये सर्व दळणवळण कालव्यांमधून चालते. कालव्यांच्या दोन्ही बाजूस इमारती आहेत. गोंडोला नावाच्या अत्यंत देखण्या बोटी चार चार जणांना व्हेनिसची सफर कालव्यांमधून हिंडून करून आणतात. येथे आम्ही ब्रिज ऑफ साईज व ग्लास फॅक्टरी असे स्थलदर्शन केले.


**फ्लॉरेन्स :**

व्हेनिसहून आम्ही फ्लॉरेन्सला गेलो. मायकेल एन्जेलो हा जगप्रसिद्ध शिल्पकार फ्लॉरेन्सचा. पण आयुष्यातही शेवटची ३० वर्षे तो रोम येथे राहिला. त्याने पोपच्या सत्तेला आव्हान दिले म्हणून त्याला सुळावर चढविण्यात आले. मायकेल अँजेलोच्या मनाने मानवी शरीराच्या अभ्यासाचा ध्यासच घेतला होता. पोपने त्याला व्हॅटिकन सिटीमधील सिस्टाइन चॅपेलचे संपूर्ण छत भित्तीलेपचित्रांनी सजविण्यास सांगितले. त्याच्या साडेचार वर्षांच्या अथक परिश्रमांनंतर पश्चिमी कलाक्षेत्रांतील त्याची अद्वितीय कलाकृती सिद्ध झाली. सतत साडेचार वर्षे ॲन्जेलो दररोज हे काम उताणे झोपलेल्या अवस्थेत पडून करीत होता असे सांगतात. नग्न अशा व्यक्तिचित्रांनी ह्या चॅपेलचे संपूर्ण छत व्यापले असून ह्या चित्रांमधून विश्वनिर्मिती, प्रलय, अध:पतन या बाबतच्या ख्रिस्ती पुराणकथा त्याने चितारल्या आहेत. मानवी शरीराच्या कोणत्याही अवस्थेचे चित्रण करण्यातील मायकेल ॲन्जेलोचे कसब विलक्षण होते. त्याचे 'क्रिएशन ऑफ आदम' हे चित्र अलौकिक आहे. त्यात आदम जमिनीवर पहुडलेला असून तो परमेश्वराच्या हस्तस्पर्शाने जिवंत होत आहे, त्याच्या शरीरात प्राणशक्तीचे संक्रमण परमेश्वराच्या स्पर्शांतून होत आहे असे दाखविले आहे. नंतरच्या पिढ्यांनी पितृस्वरूप ईश्वराची संकल्पना मायकेलच्या ह्या चित्रांतील प्रतिमेवरूनच घेतली असे मानले जाते. त्याने उभारलेली डेव्हिडची ६ मीटर उंचीची संगमरवरी मूर्ती ही एका शक्तिमान व करारी व्यक्तीची भव्य शिल्पाकृती आहे. ॲन्जेलोने त्यांच्या उतारवयांत उभारलेला सेंट पीटर्सचा घुमट हा पुढील काळात घुमटरचनेचा आदर्श ठरला.

'दि लास्ट सपर' आणि 'मोनालिसा' ह्या जगप्रसिद्ध चित्रांचा कर्ता लिओनार्दो दा व्हिंची तसेच 'टेम्पेस्ट' हे नमुनेदार चित्र बनविणारा जोर्जोन हे देखील इटलीचेच.

**पिसा :**

**पिसा** हे इटलीतील आणखी एक प्रसिद्ध ठिकाण. बातिस्ट्री, कॅथेड्रल, बेलटॉवर व पिसाचा मनोरा ही चार बांधकामे येथे एकाच चौकात आहेत. ह्या चौकात 'स्क्वेअर ऑफ मिरॅकल्स' असे नाव आहे. गॉथिक पद्धतीची



**जगातील आश्चर्यांपैकी पिसा येथील कलता मनोरा**

वास्तुकला ही युरोपीय कलेच्या विकासांतील इटलीची देणगी आहे. पिसा येथील वर्तुळाकार दीक्षागृह, कॅथेड्रलची वास्तू आणि जगप्रसिद्ध कलता मनोरा हे ह्याच गॉथिक शैलीत बांधलेले आहेत. येथील झुकता मनोरा हे जगातील सात आश्चर्यांपैकी एक आश्चर्य मानले जाते. त्याची उंची १८९ फूट असून तो दरवर्षी ०.०२५ मीटरचा चौथा भाग एवढा झुकत असतो. बोनॅनो व विल्यम ह्या दोन वास्तुशास्त्रज्ञांच्या मार्गदर्शनाखाली सन ११७४ मध्ये ह्या मनोऱ्याच्या बांधकामाला सुरूवात झाली. रोमनेस्क ह्या शोभादायक वास्तुशैलीमध्ये बांधकाम करण्याचे ठरले. बांधकाम अर्धे अधिक पूर्ण झाले आणि त्याच्या पायाकडील एका बाजूची जमीन खचून मनोरा त्या बाजूला कलला. ह्या घटनेमुळे पुढील १०० वर्षे बांधकाम स्थगित करण्यात आले. इ.स. १२७५ मध्ये वास्तुविशारदांनी एक योजना आखली व मनोऱ्याचा तिसरा व पांचवा असे दोन मजले मनोऱ्याच्या लंबरेषेबाहेर उभारून मनोऱ्याचा गुरुत्वमध्यबिंदू बदलण्याचा बेत आखून पार पाडण्यात आला. नंतर १५३० मध्ये सर्वांत वरचा मजला मूळ लंबरेषेला सोडून उभारण्यात आला व बांधकाम पूर्ण झाले. ह्या कलत्या बांधकामामुळे तसेच उत्तम वास्तूशिल्प म्हणूनही हा मनोरा जगभर प्रशंसापात्र ठरला आहे. आठ मजल्यांचा हा मनोरा शुभ्र संगमरवराचा असून असंख्य कमानी व रंगीबेरंगी संगमरवरी जडाव कामाने सुशोभित झाला आहे. तळमजला १५ स्तंभांनी युक्त असून सहा मजल्यांवर प्रत्येकी एक असे ६ कमानीमंडप आहेत. प्रत्येक कमान मंडप ३० स्तंभांवर उभा असून सर्वात वर १२ स्तंभांवर आधारलेले घंटाघर आहे. आतून वर पर्यंत जाण्यासाठी मनोऱ्याला २९६ पायऱ्या आहेत. इ.स. १९२० पासून मनोऱ्याच्या पायामध्ये कॉंक्रीटची भर घालून त्याचा झुकाव थोपविण्याचे प्रयत्न करण्यात आले तरीही अजून तो दरवर्षी थोडा थोडा झुकतोच आहे.

**व्हॅटिकन सिटी :**

टायबेर नदी रोममधून वाहते. १९२९ मध्ये पोपची राहण्याची जागा म्हणून व्हॅटिकन सिटी आस्तित्वात आली. ह्या नगरीच्या वेशीवर उंच भिंतीची तटबंदी असून आत जाण्यासाठी प्रवाशांना स्वतंत्र परवानगी घ्यावी लागते. येथील लोकवस्ती १००० असून पोपची राजवट आहे. त्यांचे स्वतंत्र आकाशवाणी केन्द्र व रेल्वे स्टेशन आहे. पोपचे भाषण एकाच वेळी ३४ भाषांमध्ये अनुवादित होऊन प्रसारित केले जाते. येथील सेंट पीटर्स चौक लंबवर्तुळाकार असून दोन्ही बाजूंच्या भिंतीमध्ये ५७ फूट उंचीचे २८४ खांब आहेत. त्यावर ११० फूट उंचीचे १४० संतांचे पुतळे आहेत.

व्हॅटिकन चर्च हे जगांतील सर्वांत महत्त्वाचे चर्च. इ.स. १५०६ मध्ये त्याचे बांधकाम सुरू झाले व ते पूर्ण होण्यास संपूर्ण शतक लागले. १०० वर्षांनी जेव्हा ते पूर्ण झाले तेव्हा अत्यंत भव्यदिव्य व देखणी अशी कलाकृती निर्माण झाली होती. मोझेक पद्धतीची अनेक चित्रे येथील भिंतींवर व खांबांवर असून छतावर मायकेल एन्जेलोची

फ्रेस्कोसिस म्हणजे भित्तिलेप चित्रे आहेत. त्याच्या 'क्रिएशन ऑफ आदम' ह्या चित्राचा उल्लेख पूर्वी आला आहे. परंतु ह्या चर्चमधील त्याच्या एका शिल्पाचाही उल्लेख येथे केला पाहिजे. येशूला त्याच्या मृत्यूनंतर जेव्हा सुळावरून खाली काढले तेव्हा त्याला मांडीवर घेऊन मेरी बसलेली आहे व आपल्या लेकराच्या कलेवराकडे कारूण्यपूर्ण नजरेने पहात आहे असे दृश्य मायकेल एन्जेलोने आपल्या कसबी हातानी अजरामर करून ठेविले आहे. किंचित उचललेला डावा हात, उजव्या हाताने सावरलेला येशूचा मृतदेह, हताशपणे खाली झुकलेली मान आणि विदीर्ण झालेला चेहरा अशी ही माता पाहाताना आपण दिङमूढ होऊन जातो. संगमरवरांतील हे 'पिएता' ह्या नावाचे शिल्प पाहताना मन सुन्न होऊन जाते.

ह्या चर्चच्या सोन्याच्या घुमटाचा व्यास २६ मीटर असून त्याची जमिनीपासून उंची ८० मीटर एवढी आहे. ह्या चर्चच्या चौकांत एक लाख लोक उभे राहू शकतील एवढा ह्या चर्चचा प्रकार विस्तीर्ण आहे. दररोज जगभरांतून लोकांचे लोंढेच्या लोंढे चर्च पहावयास येत असतात. पोप येथे असेल तेव्हा तो दर बुधवारी लोकांना संदेश देतो. व्हॅटिकनच्या रक्षणासाठी स्वित्झर्लंडहून सैनिक मागविले जातात; त्यांचा रंगीबेरंगी गणवेश मायकेल एन्जेलोनेंच डिझाईन केला आहे असे सांगितले जाते.

**अमर शहर :**

रोममधील रस्ते व चौक चांगले रूंद आणि दगडी बांधणीचे आहेत. चौका चौकांत ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाच्या असलेल्या व्यक्तींचे पुतळे आहेत. काही चौकांत सुंदर शिल्पांनी सजलेली कारंजी आहेत. ट्रेव्ही फाउंटन हे त्यापैकींच एक. ह्याचे डिझाईन बर्नीनी याने केले असून नेपच्यून आणि वरूण ह्या देवतांची शिल्पे ह्या कारंजावर विराजमान झालेली आहेत. ह्या कारंजाबद्दल एक आख्यायिका प्रचलित आहे. या कारंजाकडे पाठ करून उभे राहून आपल्या डोक्यावरून मागे कारंजात नाणे टाकले की पुन्हा एकदा रोमला भेट देण्याचा योग येतो असे म्हणतात. त्यामुळे अशी नाणी टाकणारे खूप पर्यटक दिसतात. रोममध्ये असणे हीच मुळी बऱ्याच जणांना एक रोमांचकारक गोष्ट वाटते. 'ऑल रोडस् लीड टू रोम' ह्या वाक्याचा जन्म रोमबद्दलच्या ह्या आकर्षणांतूनच झाला आहे. रोमला 'ईटर्नल सिटी' (अमरनगरी) असे संबोधिले जाते कारण कलेचे निरनिराळ्या प्रकारांनी आविष्करण करण्याचा प्रयत्न येथे अखंड चालत आलेला आहे. सीझर, मुसोलिनी इथलेच.

'व्हिक्टर इमॅन्युएल मोन्युमेंट' हे इटलीचे राष्ट्रीय स्मारक पिआत्झा व्हिनीझिया ह्या रोममधील मध्यवर्ती चौकांत आहे. 'अननोन सोल्जर'ची समाधि आहे. मुसोलिनीने आपल्या प्रभावी भाषणांनी क्रांतीची ज्योत पेटविली ती वाल्कनी येथेच आहे. येथून 'कलोसियम'कडे जो रस्ता जातो त्याचे नाव आहे 'इम्पिरिअल रोड' राजरस्ता.

'कलोसियम' ही रोमची खासियत आहे. इ.स. ७० मध्ये हे स्टेडिअम बांधण्यास सुरुवात झाली व इ.स. ८० मध्ये ते काम पूर्ण झाले. येथे जंगली श्वापदे विरूद्ध गुलाम अशी युद्धे होत. ग्लॅडिएटर्सची द्वंद्वे होत. कधी कधी ८ ते १० गुन्हेगार एकाचवेळी आत सोडले जात. त्यांचेपैकी एकजण जिवंत राहीपर्यंत त्यांचे युद्ध चाले. सहाव्या शतकापर्यंत ही प्रथा चालू होती. नंतर ती बंद झाली. दुसऱ्या महायुद्धात येथे जोरदार बॉम्बहल्ले झाले. आज येथे त्याचे अवशेष शिल्लक आहेत. रोमने आपले सर्व खंडहर अवशेष आज २००० वर्षे उत्तम प्रकारे जतन करून ठेवले आहेत. चौकाचौकांत जुन्या राजांचे पुतळे आहेत, राजमहालांचे अवशेष आहेत. हे सर्व खंडहर, शिल्पे कारंजी, रोमचा गेल्या २००० वर्षांचा इतिहास आपल्यापुढे जिवंत करीत असतात. येथे नेपच्यूनचे व सूर्याचे मंदिर आहे. 'वॉर मेमोरियल ग्राऊंड'वर एक ज्योत सतत तेवत असते. रोमन

फोरममध्ये पूर्वी एक अग्निमंदिरही होते. ह्या देवळांतील अग्नी सतत जळता राहिला पाहिजे असा नियम होता आणि हे काम करण्याची जबाबदारी मंदिराला अर्पण केलेल्या कुमारिकांची म्हणजे 'वेस्टल व्हर्जिन्स' ची होती. आपल्याकडील अग्निहोत्राची परंपरा तर येथे आठवतेच पण आपल्याकडील देवदासी परंपरेचीही आठवण होते. रोम आणि भारत पश्चिम आणि पूर्व ह्यांच्यातील पुराणपरंपरांमधील हे साम्य मनाला थक्क करून सोडते.

रथाच्या शर्यतीसाठी म्हणून येथे पूर्वी एक लंबवर्तुळाकार ॲम्फी थिएटर बांधले होते. हाच आजचा 'पिआत्झा नोव्होना' हा चौक. बर्नीनी या प्रसिद्ध शिल्पकाराने ह्या चौकांत तीन सुंदर कारंजी बांधली आहेत. यांतील मधल्या कारंजाच्या मध्यावर एक उंच स्तंभ असून त्याच्या चार बाजूंना जगांतील चार नद्या- नाईल, प्लेट, डान्यूब आणि गंगा यांचे प्रतीक असलेले चार भव्य पुतळे आहेत. ह्या स्तंभाखालून पाणी वहात असते.

बार्बेटिनी हे पोपचे पद भूषविणाऱ्या घराण्यांमधील प्रसिद्ध घराणे. बार्वेरिनी पॅलेससमोरील चौकांत (पिआत्झा बार्वेटिती / ट्रायटन फाऊंटन आहे. चार डॉल्फिन माशांनी चार बाजूंनी एक मोठा शिंपला तोलून धरला असून त्यामध्ये बसून ट्राटटन ही जलदेवता शंख फुंकीत असल्याचे दर्शविणारे हे शिल्प असून ह्या शंखांतून पाण्याचे कारंजे उडत असते.

सर्वसाधारणपणे युरोपांत संध्याकाळी ६ वाजता दुकाने बंद झाली की रेस्टॉरंटच्या बाहेर रस्त्यावर खुर्च्या व टेबले मांडली जातात. त्यांवर रंगीबेरंगी छत्र्या विराजमान होतात. मग त्याठिकाणी यथेच्छ मद्य व भोजन रिचवीत गप्पांचे अड्डे जमतात. मात्र मद्यपान इतक्या मोठ्या प्रमाणावर, मुक्तपणे चाललेले असूनही झिंगलेले कोणी रस्त्याच्या कडेला पडले आहे अशा प्रकारचे दृश्य १५ दिवसात कोठेही दृष्टीस पडले नाही.

**रहदारीतील शिस्त :**

इंग्लंड वगळता इतर सर्व युरोपमध्ये वाहनामध्ये ड्रायव्हर डाव्या बाजूला बसतो व रस्त्याच्या उजव्या बाजूने वाहन चालवितो. फक्त इंग्लंडमध्ये आपल्यासरखी वाहने डाव्या बाजूने चालविण्याची पद्धत आहे. वाहतूक अत्यंत शिस्तबद्धपणे चालते. वाहने मधे मधे घुसविण्याची पद्धत नाही. ट्रॅफिक जाम झाला तरीही वाहने संथपणे एकामागून एक अशी जात असतात. हॉर्न वाजविणे असभ्यपणाचे समजले जाते. त्यामुळे ट्रॅफिक कितीही जाम झाला तरी आवाज, कोलाहल, ध्वनिप्रदूषण असले प्रकार नाहीत. पादचाऱ्यांसाठी असलेल्या क्रॉसिंग पट्ट्यांशी तुम्ही उभे दिसलात तर वाहने थांबून तुम्हाला रस्ता ओलांडू देतात. इमर्जन्सी व्हेहिकल्ससाठी असलेल्या लेनमधून दुसरे वाहन जाताना दिसत नाही. आपल्याकडील सिग्नलपाशीही वाहन जलद पुढे रेटण्याच्या प्रवृत्तीच्या पार्श्वभूमीवर रहदारीतील ही शिस्त फारच कौतुकास्पद वाटली.

सर्व सहलभर चहासाठी १॥ ते २ युरो व कॉफीसाठी २ ते ३ युरो किंमत पडत असे. अपवाद फक्त व्हेनिसचा. येथे एका लहानशा हॉटेलात कॉफी ८० सेंटसूना मिळाली. सुरवातीस दरवेळी काही घेतले की किती रुपये पडले हा हिशोब मनात येई. १ युरोचा दर रु. ५५/- इतका होता. पहिल्यांदा पॅरिसला १ चहा व १ कॉफीसाठी ५ युरो देतांनाा आपण ही चैनच करतो आहो की काय असेच वाटले. हा हिशोब मनात आला की कुठलीही छोटीशी खरेदी ही आनंददायी ठरेना. मग मनाने हा हिशेबाचा चाळाच थांबविला.

**अविस्मरणीय :**

सहल संपतेवेळी आयुष्यांतील एक अविस्मरणीय आणि आनंदमय पर्व संपत आल्याची जाणीव जागी होत होती. आजपर्यंत अनेक सहली झाल्या, त्याही आनंददायीच

(पान २३ वर)

ज्यांना वस्तुस्थिती स्वीकारता येत नाही, ते निराश असतात.

# एस्. एस्. सी. परीक्षा आणि अंतर्गत मूल्यमापन

*शालान्त परीक्षेतील गुणांकनात करण्यात आलेल्या महत्त्वपूर्ण बदलांविषयीचे हे चिंतन - संपादक*

२००६ - २००७ पर्यंत एस्. एस्. सी. परीक्षेला कोणत्याही प्रकारचे अंतर्गत मूल्यमापन केले जात नसे. परंतु इ. ९ वी पर्यंत मात्र तोंडी परीक्षा, गृहपाठ / स्वाध्याय इ. चे गुण ह्या स्वरूपात अंतर्गत मूल्यमापन असायचे. २००७ - २००८ पासून अंतर्गत मूल्यमापनाला सुरुवात झाली. हा एस्.एस्.सी. ह्या पहिल्याच सार्वधिक परीक्षेच्या दृष्टीने महत्त्वाचा बदल असे म्हणता येईल. अंतर्गत मूल्यमापनाला सुरुवात करावी, असे एस्.एस्.सी. बोर्डाला का बरे वाटले असावे? याचे महत्त्वाचे कारण म्हणजे CBSE बोर्ड, ICSE बोर्ड आणि एस्.एस्.सी. बोर्ड ह्यांच्या गुणांच्या बाबतीत, विशेषत: हुशार विद्यार्थ्यांच्या बाबतीत, आढळणारी तफावत होय. आजवरच्या अनेक वर्षांच्या अनुभवावरून शिक्षण धुरीणांच्या एक गोष्ट लक्षात आली ती म्हणजे इ. ११ वी च्या प्रवेशाच्या दृष्टीने जी गुणवत्ता यादी तयार करण्यात येते, त्यामध्ये CBSE आणि ICSE बोर्डाच्या विद्यार्थ्यांचा क्रमांक नेहमी वरचा असायचा आणि या स्पर्धेमध्ये एस्.एस्.सी बोर्डाचे विद्यार्थी मागे पडायचे. शिक्षणतज्ज्ञांना आणि अभ्यासकांना हेही जाणवले की एस्. एस्. सी. बोर्डाला CBSE आणि ICSE बोर्डांप्रमाणे अंतर्गत मूल्यमापन नाही, त्यामुळे एस्.एस्.सी. बोर्डाच्या मुलांना त्या बोर्डांच्या तुलनेने कमी गुण पडतात. परिणामी इ. १० वी च्या प्रवेशाच्या स्पर्धेमध्ये एस्.एस्.सी. बोर्डाची मुले मागे पडतात. या गोष्टीचा साधक बाधक विचार करून एस्.एस्.सी. बोर्डाने देखील मार्च २००८ च्या परीक्षेपासून अंतर्गत मूल्यमापनाला सुरुवात केली.

**मौखिक परीक्षा :**

अंतर्गत मूल्यमापनामध्ये भाषा विषयांमध्ये २० गुणांच्या तोंडी परीक्षेचा अंतर्भाव करण्यात आला. ज्या मुलांना लेखी परीक्षेमध्ये तुलनात्मक दृष्ट्या कमी गुण मिळतात, त्यांच्या दृष्टीने तोंडी परीक्षा स्तुत्य होय. ती त्यांना निश्चितच दिलासा देणारी आहे. ऐकणे, बोलणे, वाचणे आणि लिहिणे ही कुठल्याही भाषा विषयाच्या अध्ययनाची फार महत्त्वाची अंगे आहेत. त्याशिवाय भाषा विषयाचा अभ्यास पूर्णच होऊ शकत नाही. परंतु आजवर परीक्षेमध्ये केवळ लेखन कौशल्यावरच भर दिला जात असे आणि इतर अंगे दुर्लक्षितच रहात असत. आपले विचार, कल्पना, भावना दुसऱ्याला सांगणे त्याचे विचार, भावना समजून घेणे, आपला मुद्दा दुसऱ्याला पटवून देणे इ. गोष्टींमध्ये कौशल्य संपादन करणे हा भाषा विषयांच्या अध्यापनाचा प्रमुख हेतू आहे आणि ते कौशल्य विद्यार्थ्यांनी कितपत आत्मसात केलेले आहे, याचे मूल्यमापन करण्याच्या दृष्टीने तोंडी परीक्षा घेणे आवश्यक आहे.

अशा रीतीने तोंडी परीक्षा सुरू करण्याच्या हेतू स्तुत्य आहे. परंतु अंमलबजावणीचे काय? आपल्याकडे शिक्षणक्षेत्रामध्ये अनेक योजना, कल्पना तत्त्वत: चांगल्या असतात. परंतु त्यांना यश येत नाही. त्यांच्या अंमलबजावणीमधील अपयश येते. कारण त्याची कार्यवाही करणाऱ्या प्रमुख घटकांपैकी शिक्षक ह्या घटकाचा दृष्टिकोन आणि वृत्ती याला जबाबदार असते. तोंडी परीक्षेचे गुण खिरापतीप्रमाणे वाटायचे आणि विद्यार्थी परीक्षेमध्ये उत्तीर्ण होण्याच्या दृष्टीने बोनस गुण ह्या दृष्टिकोनातून

त्यांच्याकडे पहायचे, असे जर शिक्षकांनी ठरविले तर तोंडी परीक्षेचा मूळ हेतू साध्य होणार नाही. शिक्षकांच्याही काही मर्यादा आहेत हे मान्य आहे. विशेषत: वेळेची मर्यादा आणि संख्येची मर्यादा. अतिशय अल्प वेळेमध्ये बऱ्याच विद्यार्थ्यांची अनेक प्रकारच्या भाषिक कौशल्यांची परीक्षा घेणे आणि त्यांचे योग्य मूल्यमापन करणे ही कठीण गोष्ट आहे. त्यासाठी नियोजनाची, सरावाची आणि अभ्यासाची गरज आहे. विशेषत: संभाषण कौशल्य आणि भाषण ह्यांच्या संदर्भात म्हणता येईल. ह्या गोष्टींचा सराव इ. ९ वी पर्यंतच्या तोंडी परीक्षांमधून देणे आवश्यक आहे. विविध विषय देऊन त्यावर तयारी करून किंवा उत्स्फूर्तपणे बोलण्याची विद्यार्थ्यांना संधी प्राप्त करून देणे गरजेचे आहे. नाहीतर परीक्षेच्या वातावरणामध्ये विद्यार्थ्यांना एखाद्या विषयावर संभाषण करावयास सांगितल्यास किंवा भाषण करावयास सांगितल्यास बिलकुल प्रतिसाद मिळत नाही किंवा अतिशय अल्प प्रतिसाद मिळतो असा अनुभव येतो.

**प्रयोग परीक्षा :**

विज्ञान आणि तंत्रज्ञान ह्या विषयामध्ये प्रयोगपरीक्षा असते आणि ती शाळेतच घेतली जाते. ही परीक्षा, नवीन अभ्यासक्रम १९७४-७५ पासून चालू झाला, तेव्हापासून घेतली जात आहे. त्यावेळी ती ३० गुणांची होती, आता २० गुणांची आहे, एवढाच फरक. परंतु ही परीक्षा कशाप्रकारे घेतली जाते आणि गुणदान कशाप्रकारे केले जाते, हे एक उघड गुपित आहे. ह्या परीक्षेला एक बाह्य परीक्षक (दुसऱ्या शाळेचे शिक्षक) आणि एक आंतरपरीक्षक (त्याच शाळेचे शिक्षक) असतो. परंतु ही परीक्षा त्या त्या शाळेतच घेतली जात असल्यामुळे तिचा मी हेतुत: अंतर्गत मूल्यमापनामध्ये समावेश केलेला आहे. ह्या परीक्षेकडे देखील विद्यार्थ्यांना उत्तीर्ण होण्याचा दृष्टीने एक साहाय्यक माध्यम ह्या दृष्टिकोनातून पाहिले जात असल्यामुळे सढळ हस्ते गुण दिले जातात. लायक विद्यार्थ्यांना अधिक गुण देण्याबाबत कुणाचेही दुमत असणार नाही. परंतु इतर विद्यार्थ्यांचे काय? ह्या प्रयोगपरीक्षेमुळे विज्ञान विषयामध्ये अनुतीर्णतेचे प्रमाण कमी असते हे सत्य आहे. कित्येकदा विद्यार्थ्याला प्रयोगपरीक्षेपेक्षा बोर्डाच्या लेखी परीक्षेमध्ये कमी गुण असे प्रकार पहावयास सापडतात. ते ह्याचमुळे. ह्यातूनच मग बाह्य परीक्षकाची उत्तम प्रकारे बडदास्त ठेवून, त्याची चांगल्याप्रकारे सरबराई करून त्याच्यावर अप्रत्यक्षरीत्या दडपण आणणे इ. अनुचित प्रकार घडतात. बाह्य परीक्षक हा आपल्या शाळेमध्ये पाहुणा म्हणून आलेला असतो, त्याचे आदरातिथ्य करणे हे शिष्टाचारास आणि आपल्या संस्कृतीस धरून आहे, पण त्याची सांगड विद्यार्थ्यांच्या गुणांशी घातली जाऊ नये एवढीच अपेक्षा.

विज्ञान विषयामध्ये प्रयोगांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. विद्यार्थ्यांनी केवळ तात्विक ज्ञान न मिळवता प्रयोग करून त्याचा पडताळा घेणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांनी स्वत: उपकरणे हाताळावीत, स्वत: प्रयोग करून पहावेत, त्यातून त्यांचे प्रायोगिक कौशल्य विकसित व्हावे अशी अपेक्षा आहे आणि त्यासाठी प्रयोग परीक्षेचे प्रयोजन आहे. परंतु शहरातील काही मोठ्या शाळा वगळता, विशेषत: ग्रामीण भागामध्ये किती शाळांमध्ये सुसज्ज प्रयोगशाळा आहेत, किती शाळांमधून प्रयोगसाहित्य उपलब्ध आहे, किती शाळांमधून विद्यार्थ्यांना प्रयोग करून दाखविले जातात आणि विद्यार्थ्यांना प्रयोगांचा सराव दिला जातो, हा अभ्यासाचा विषय आहे. नाहीतर केवळ प्रयोग परीक्षेचे नाटक करणे आणि विद्यार्थ्यांच्यावर गुणांची उधळण करणे, एवढंच होत असेल, तर प्रयोगपरीक्षेचा मूळ हेतू बाजूलाच राहिला असे खेदाने म्हणावे लागेल.

**गणित आणि समाजशास्त्र ह्या विषयांतील अंतर्गत मूल्यमापन :**

इंग्रजी आणि गणित हे दोन विषय विद्यार्थ्यांच्या दृष्टीने 'असंतोषाचे जनक' आहेत, असे म्हणावयास

माणसाने निदान स्वत:ला तरी नीट समजावून घ्यावे.

हरकत नाही. ह्याच दोन विषयांमध्ये विद्यार्थी एस्. एस्. सी. परीक्षेला अनुतीर्ण होतात. किंबहुना ह्या दोन विषयांमध्ये जे विद्यार्थी उत्तीर्ण, तोच शाळेचा निकाल असे समीकरणच बनून गेलेले आहे. तोंडी परीक्षा सुरू केल्यामुळे इंग्रजीचा प्रश्न सुटला होताच. आता अंतर्गत मूल्यमापनामुळे गणिताचाही प्रश्न सुटल्यात जमा आहे. शिवाय गणित-विज्ञान Combinal Passing ची सवलत आहेच.

गणितामध्ये आता स्वाध्याय सुरू करण्यात आलेले असून त्यांना १० गुण आहेत. 'Practice makes a man perfect'. गणित हा सरावाचा विषय आहे. गणिताचा एखादा नमुना शिकल्यानंतर त्याच नमुन्याची अनेक उदाहरणे सोडविणे, त्याचा सराव करणे, ह्या गोष्टी आवश्यक आहेत. त्यासाठी हे स्वाध्याय सुरू करण्यात आलेले आहेत. त्यातून वेळोवेळी त्या त्या पाठ्यांशाची उजळणी साध्य होणार आहे आणि एस्.एस्.सी. च्या अंतिम परीक्षेला त्याचा उपयोग होणार आहे हे निश्चित. परंतु त्यासाठी सर्व स्वाध्याय विद्यार्थ्यांनी प्रामाणिकपणे पूर्ण करणे आवश्यक आहे. तसेच वर्षभरामध्ये होणाऱ्या परीक्षांसाठी मिळून (एक चाचणी, प्रथम एक परीक्षा आणि सराव परीक्षा) २० गुण आहेत. हे गुण किती पारदर्शकपणे दिले जातात, हे महत्त्वाचे आहे. कुठल्याही शाळेला आपला निकाल उंचावला जावा असे वाटणे साहजिक आहे आणि त्यातील प्रमुख अडसर गणित हा विषय आहे. साहजिकच काही मुख्याध्यापक 'पेपर सोपे तपासा आणि विद्यार्थ्यांना सैल हाताने गुण द्या' असे गणित विषय शिक्षकांना सांगण्याची शक्यता नाकारता येत नाही. मग अशा प्रकारचे अंतर्गत मूल्यमापन कितपत विश्वसनीय आहे?

समाजशास्त्राच्याही बाबतीत तेच म्हणता येईल. समाजशास्त्राला वर्षभराच्या परीक्षांसाठी १० गुण आणि स्वाध्यायासाठी १० गुण असे एकूण २० गुण आहेत. इंग्रजी - गणित खालोखाल समाजशास्त्रामध्ये देखील अनुत्तीर्णतेचे प्रमाण बरेच असल्यामुळे ह्या विषयामध्ये देखील अंतर्गत गुण सुरू करण्यात आलेले आहेत. गणित आणि समाजशास्त्र ह्या विषयांच्या अंतर्गत गुणांच्या बाबतीत आणखी एक मुद्दा विचारात घेण्यासारखा आहे. बाहिस्थ विद्यार्थ्यांसाठी (१७ नंबर फॉर्म भरणारे विद्यार्थी) गुणदानाची वेगळी पद्धत आहे. बाहिस्थ विद्यार्थ्यांना वर्षभराच्या परीक्षा नसल्यामुळे त्यांना गणित आणि समाजशास्त्र विषयासाठी स्वाध्याय पुस्तिका नेमण्यात आलेल्या आहेत. गणित विषयाला स्वाध्याय पुस्तिकेला ३० गुण आणि समाजशास्त्र विषयाला २० गुण आहेत. ही स्वाध्याय पुस्तिका हे विद्यार्थी इतर हुशार विद्यार्थ्यांकडून किंवा प्रसंगी शिक्षकांकडून देखील सोडवून घेण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे काही वेळा बहिस्थ विद्यार्थ्यांना नियमित विद्यार्थ्यांपेक्षा अधिक गुण अशी विचित्र परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे आणि हे एक प्रकारे त्यांच्यावर अन्यायकारक आहे.

एकंदरीत अंतर्गत मूल्यमापनाचे यशापयश आपण त्याच्याकडे कोणत्या दृष्टिकोनातून पहातो ह्यावर बरेचसे अवलंबून आहे. शाळेचा निकाल वाढविण्याचे एक साधन, विद्यार्थ्यांचे गुण वाढविण्याचा एक मार्ग ह्या दृष्टिकोनातून आपण अंतर्गत मूल्यमापनाकडे पहात असू, तर अंतर्गत मूल्यमापनाचा मूळ हेतू साध्य होणार नाही अंतर्गत मूल्यमापन वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून होणे आवश्यक आहे. अंतर्गत मूल्यमापनाचे काही अनिष्ट परिणाम आपण ह्या वर्षीच मार्च २००८ च्या एस्.एस्.सी. परीक्षेनंतर अनुभवलेले आहेत. पहिली गोष्ट म्हणजे, जवळजवळ सर्वच शाळांचे निकाल, काही अपवाद वगळता, सुमारे ५% नी सुधारले, त्यामुळे इ. ११ वी च्या प्रवेशाचा प्रश्न अधिक कठिण झाला. दरवर्षी इ. ११ वी च्या प्रवेशाचा प्रश्न संबंधितांना भेडसावतोच, पण ह्यावर्षी त्याने अधिक गंभीर स्वरूप धारण केले. दुसरे म्हणजे विद्यार्थ्यांच्या गुणांमध्ये देखील लक्षणीय वाढ झाली. प्रत्येक विद्यार्थ्याचे

गुण सुमारे ५% नी वाढले. त्यातून एक चुकीचा संदेश गेला. आपल्याला चांगले गुण मिळालेत. आपण हुशार आहोत असा समज काही विद्यार्थ्यांचा झाला. तशात चांगले गुण मिळाले, म्हणजे विज्ञान शाखेकडेच गेले पाहिजे. किमान पक्षी कॉमर्सकडे तरी गेलेच पाहिजे असे त्यांना वाटले. कारण आपल्याकडे तशी मानसिकताच आहे. परिणामी इ. ११ वी प्रवेशाचा प्रश्न अधिक बिकट बनला. विज्ञान आणि वाणिज्य शाखांकडे प्रवेश मिळवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या भरमसाठ वाढली, तुलनात्मक दृष्ट्या कला शाखेकडे प्रवेशेच्छुक विद्यार्थ्यांची संख्या घटली. ह्याचा दुसरा आणखी एक दुष्परिणाम संभवतो. ज्यांनी आपल्याला चांगले गुण मिळालेत, आपण हुशार आहोत, ह्या (गैर) समजुतीने विज्ञान शाखेत प्रवेश घेतला असेल, त्यांना जर इ. ११ वी च्या परीक्षेमध्ये कमी गुण मिळाले, तर त्यांना नैराश्य येण्याची शक्यता आहे आणि ही गोष्ट खचितच चांगली नाही.

मी नकारात्मक किंवा निराशावादी सूर लावलाय, असे काहीना वाटण्याची शक्यता आहे. परंतु तसा माझा मुळीच हेतू नाही. सुरुवातीलाच मी सांगितल्याप्रमाणे एखादी गोष्ट तत्त्वत: चांगली असली तरी तिच्या कार्यवाहीतील दोषांमुळे फरक पडू शकतो. तोंडी परीक्षा, प्रयोग परीक्षा, त्यांच्यात ह्यांचा मूळ हेतू स्तुत्य, चांगलाच आहे. पण अंतर्गत मूल्यमापन वस्तुनिष्ट दृष्टिकोनातून केले न गेल्यास, आणि केवळ निकाल उंचावण्याचा मार्ग म्हणून त्याचा उपयोग केला गेल्यास, काहीच साध्य होणार नाही. शाळेचा निकाल उंचावला, विद्यार्थ्यांच्या संपादणुकीमध्ये वाढ झाली अशी एक भ्रामक समजूत होईल, परंतु ही वाढ म्हणजे खरोखरीच वाढ आहे, की केवळ सूज आहे ही विचार करण्यासारखी गोष्ट आहे. अनेक चांगल्या शैक्षणिक कल्पनांचा, योजनांचा विचार करण्यात आपण हुशार आहोत. त्यांचा बोजवारा कसा उडेल, ह्यात आपण सर्वजण

(पान २५ वर)

(पान १९ वरून)

**युरोपची तोंड ओळख**

होत्या पण ह्या एकाच सफरीमध्ये जे नावीन्य, विविधता अनुभवली तिला तोड नाही. युरोपभर अजूनही (१ मे पर्यंत) बऱ्यापैकी थंडी होती. स्वित्झर्लंडला तर तापमान ०° सें. होते. रोममधील जोरदार पावसाने वर्षासहलीचाही अनुभव दिला. आम्ही आजवर विमानप्रवास केला नव्हता तो एकाच ट्रिपमध्ये ५ वेळा विमानप्रवास तर झालाच पण बस, ट्राम, यूरेल, कॉगव्हील ट्रेन, ट्रॉली ह्या सर्वांतून प्रवास झाला. बोट राईड झाली, कॅनॉल सफारी, क्रूझ सफारीही झाली. माऊंट टिटलीस तसेच टॉप ऑफ युरोपला जाऊन झाले तसेच वॉटर्लू - नॉर्ड ह्या दरम्यान समुद्राखालूनही प्रवास झाला. आयफेल टॉवर वरही गेलो. विविध हॉटेल्स व रेस्तरांमध्ये जेवलो, माऊंट टिटलीस व टॉप ऑफ युरोप येथे जेवलो, क्रूझवर संगीताच्या संगतीत रवाना झाला तसेच एकदा कार पार्किंग मध्ये उभ्यानेही जेवण घ्यावे लागले.

अशी ही 'युरोपची तोंडओळख' ही सहल विविधानुभव संपन्न आणि अत्यानंददायी ठरली मात्र तिनेच एक विषण्ण करणारा विचारही मनात जागविला. तो विचार असा होता की, आपल्याकडील कितीतरी राजकारणी अधिकारी व्यक्ती वरचेवर परदेशवारी करीत असतात. इतक्या वेळा तिकडे जाऊन आल्यावरही तेथील स्वच्छता, प्रामाणिकपणा, शिस्त आपल्या देशातही यावी म्हणून प्रयत्न करण्याचे कोणाच्याच कसे मनात येत नाही.

**सौ. सुनीता खरे**

बी - ५४, मेघदूत सोसा.,
शहाजी रोज रोड, कोलडोंगरी,
अंधेरी पूर्व, मुंबई - ४०००६९
दूरध्वनी - २६८२६६९४
भ्रमणध्वनी - ९९२०७१०५९०

●●●

# घर एक मंदिर

*आपल्या वागण्याने आपण मंदिराचे पावित्र्य घरातही निर्माण करू शकतो. त्याबद्दलचे हे चिंतन - संपादक*

देवदर्शन घेण्यासाठी आपण रोज नित्यनियमाने मंदिरात जातो. देवाची मनोभावे पूजा करतो. माझ्या दारात घरात सुख नांदू दे. माझ्या कार्यात यश येऊ दे, सर्वांना सुखी ठेव इ. अशा अनेक गोष्टी देवाकडे मागत असतो. तर दुसरीकडे आपण म्हणत असतो की, जळी, स्थळी, काष्टी, पाषाणी अशा सर्व ठिकाणी परमेश्वर वास्तव्य करीत असतो. जर परमेश्वर सर्व ठिकाणी व्याप्त असेल तर आपण परमेश्वर प्राप्तीसाठी मंदिराकडेच का धाव घेतो? इतर ठिकाणी आपणांस परमेश्वर प्राप्त करता येत नाही का? अनेक व्यक्ती रोज सकाळी - संध्याकाळी आणि कार्यालयातही नित्यनियमाने देवाची पूजा करतात आणि घरी आल्यानंतर छोट्या - छोट्या गोष्टीवरून वाद-विवाद करतात, पत्नी आणि मुलांवर राग करतात. तर कार्यालयात लहान-लहान चुकीवरून वरिष्ठ हाताखालच्या सहकाऱ्यांवर रागवतात, चिडतात. अशा वागण्याने परमेश्वर प्राप्त होतो का? संसारात सुख मिळते का? कार्यालयात शांती मिळते का?

आपण मंदिरात गेल्यानंतर ज्याप्रमाणे आपणांस प्रसन्न वाटते, आनंद होतो, शांत वाटते. त्याप्रमाणे असा आनंद आपल्या घरात किंवा कार्यालयात घेता येत नाही का? मंदिरातील वातावरण शांत आणि प्रसन्न असते असे वातावरण आपल्या घरात निर्माण केल्यास नक्कीच आपणास परमेश्वर प्राप्तीचा आनंद आपल्या घरातच घेता येईल. त्यासाठी आपणास घरातील वातावरण ठीक केले पाहिजे. वडिलधाऱ्या माणसांचा मान ठेवून त्यांचीच पूजा केली पाहिजे. लहान मुलांबरोबर लहान होऊन त्यांच्यातही रमले पाहिजे. पत्नीच्या सुखदुखात सामील व्हायला हवे. आपले आईवडिलच विठ्ठल-रुक्मिणी असतात. त्यांचीच पूजा करा, त्यांना सन्मानाने वागवा आणि नित्यनियमाने घरीच परमेश्वराची पूजा करा त्यामुळे घर प्रसन्न होऊन सुखी होण्यास वेळ लागणार नाही.

प्रत्येक घरात छोटे - छोटे वादविवाद होणारच, संकटे येणारच. असे वादविवाद / संकटे दूर करण्याचा प्रयत्न करा. रोज घरात देवाची पूजा करा आणि परमेश्वर प्राप्तीचा आनंद घ्या. माझ्या घरातील संकटे दूर होऊ दे, सर्व वादविवाद मिटू दे. सर्व काही ठीक होऊ दे, मगच मी देवाची पूजा करेन असे म्हणणे चुकीचे ठरेल. एक व्यक्ती समुद्र किनारी बसलेली असते. तिला विचारले येथे का बसला आहेस. त्याने उत्तर दिले मी या समूद्रात आंघोळ करण्यासाठी बसलो आहे. त्याला सांगितले मग जा कर. आंघोळ करायची वाट पहातोस? त्यावेळी त्याने सांगितले या समुद्रातील लाटा थांबल्यानंतरच मी आंघोळ करणार आहे. समुद्राच्या लाटा थांबणार नाहीत आणि त्या व्यक्तीस आंघोळ करण्याचा योग काही येणार नाही. म्हणून आहे त्या परिस्थितीतून मार्ग काढून परमेश्वराची पूजा करा, जप करा, तप करा किंवा भजन करा आणि जीवनाचा आनंद लुटा व इतरांनाही आनंद घेऊ द्या. दारू पिऊन झुलण्यापेक्षा भगवंताच्या नामस्मरणात झुलने केव्हाही चांगले. शांती मिळवण्याचा प्रयत्न आपल्या घरापासूनच सुरू करा. मंदिरामध्ये जाऊन किंवा हरिद्वार, काशी, मथुरा येथे जाऊन परमेश्वर प्राप्तीचा आनंद घेण्यापेक्षा आपल्या घरालाच मंदिर, काशी, मथुरेचे स्वरूप आणा. घरातील सुगंध काशी, मथुरा आणि हरिद्वारापर्यंत दरवळू द्या. यातच आपले सुख आहे. ज्या घरात सुख, शांती, समाधान नांदत असते अशा

आज कोठे आहोत याचा विचार करण्यापेक्षा उद्या कोठे पोहोचू याचा विचार करा.

ठिकाणीच लक्ष्मीचा वास असतो, लक्ष्मी स्थिर असते आणि ज्या घरात नेहमी क्लेश, भांडण - तंटे असतात अशा घरात लक्ष्मी आली तरी ती टिकत नाही. एका दरवाजातून येते आणि दुसऱ्या दरवाज्यातून निघून जाते.

इतरांशी बोलतांना आपण गोड शब्दांतच बोलायला हवे. गोड बोलण्याने न होणारे कामही होऊ शकते. गोड बोलण्याने स्वत:ला आणि इतरांना समाधान मिळते. म्हणून शब्द गोड आणि मधुर असावेत. केवळ शब्द गोड बोलून चालत नाहीत ते गोड शब्द बोलण्याने दुसऱ्यास शांती मिळायला हवी, समाधान मिळायला हवे. नाही तर काही व्यक्ती अशा असतात की, केवळ शब्द गोड आणि मधुर वापरतात परंतु अशा शब्दा - शब्दातून क्रूरता दिसून येते, ज्वाला भडकत आहेत असे वाटते. अशा क्रूर बोलण्याने इतरांच्या दु:खात अधिक भरच पडत जाते आणि नंतर आपण त्याचा पश्चाताप करत बसतो. केलेल्या चुकीबद्दल परमेश्वराकडे माफी मागतो. अशावेळी केलेल्या चुकांबद्दल परमेश्वराकडे माफी मागून उपयोग नसतो तर ज्या व्यक्तीचे मन दुखावले आहे, ज्या व्यक्तीच्या आपण भावना दुखावल्या आहेत त्या व्यक्तीजवळच माफी मागायला हवी. वाटल्यास पुन्हा परमेश्वराजवळ एक मागणे मागायला हवे. हे परमेश्वरा, पुन्हा मला अशी दुर्बुद्धी देऊ नकोस. माझ्या बोलण्याने कोणाचेही मन दुखावणार नाही अशी वाणी मला दे. या ठिकाणी आपण एक गोष्ट लक्षात ठेवायला हवी ती म्हणजे आपणास जे काही हवे आहे ते सर्व परमेश्वराकडे मागा. दुसऱ्यापुढे केव्हाही हात पसरू नका. या जगात माणसे फक्त आश्वासने देतात पण प्रत्यक्षात काही देण्याची वेळ आली की पळ काढतात. म्हणून दुसऱ्यासमोर केव्हाही हात पसरू नका. ज्यावेळी आपण एखादी गोष्ट दुसऱ्याकडे मागतो त्यावेळी आपणास दुसऱ्यासमोर लहान व्हावे लागते. त्याच्यासमोर झुकावे लागते, शरण जावे लागते. अगदी व्यक्ती आपल्यापेक्षा लहान असेल तरीही. म्हणून इतरांसमोर केव्हाही हात पसरू नका. ज्याच्याकडे आपण हात पसरतो ती व्यक्ती आपल्या मजबुरीचा गैरफायदा घेत असते. आपल्या लाचारीकडे बघून हसत असते. म्हणून जे काही मागायचे असेल ते परमेश्वराकडे मागा, परमेश्वरालाच शरण जा, अगदी रडायचे असेल तरीही परमेश्वराच्या पायावर डोके ठेवून खुषाल रडा आणि आपले मन हलके करा. पण कोणापुढे आपले आश्रू वाहू नका आणि हात पसरू नका. अगदी आपल्या जन्म दिलेल्या मुलापुढेही नको.

**श्री. यशवंत माने**

ग्रंथालय विभाग,
रुपारेल महाविद्यालय,
मुंबई - ४०००२६

●●●

---

(पान २३ वरून)

**एस्.एस्.सी. परीक्षा आणि अंतर्गत मूल्यमापन**

हुशार आहोत, हे आजवर सिद्ध झालेले आहे. कार्यानुभव, समाजसेवा इ. श्रेणी विषयांच्या मूल्यमापनाच्या व्याप्तीतील आपला अनुभव असाच विचार करावयास लावणारा आहे. तसे अंतर्गत मूल्यमापनाचे होऊ नये इतकेच. निकाल वाढला, मुलांचे गुण वाढले, तर कुणालाही वाईट वाटण्याचे कारण नाही. परंतु शाळेचा दर्जा, विद्यार्थ्यांचा दर्जा खरोखरच वाढला का ह्याचा विचार प्रत्येक मुख्याध्यापकाने, प्रत्येक शिक्षकाने अंतर्मुख होऊन करणे, गरजेचे आहे असे मला वाटते.

**श्री. प्र. द. अरदकर**

मुख्याध्यापक,
श्रीरंग विद्यालय, ठाणे.

●●●

# डॉ. बेडेकर विद्या मंदिराची - समर्थ धुरा!

आमच्या बेडेकर विद्या मंदिराच्या मुख्याध्यापिका सौ. उषातई कळमकर यांना मिळालेल्या पुरस्काराच्या निमित्ताने हा धावता परिचय - संपादक



**पुरस्कार स्वीकारताना सौ. उषा कळमकर**

ठाणे महानगरपालिका शिक्षण मंडळातर्फे दिला जाणारा 'आदर्श शिक्षक महापौर पुरस्कार' यावर्षी डॉ. बेडेकर विद्या मंदिर या शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. उषा जयंत कळमकर यांना देऊन १७ सप्टेंबर २००८ रोजी गौरविण्यात आले. हा भव्य दिव्य गौरव सोहळा गडकरी रंगायतन या ठिकाणी आयोजित करण्यात आला होता. शिक्षक दिनाचे औचित्य साधून ज्ञानवंत, गुणवंत व कलावंत शिक्षकाचे कौतुक करण्याची ठाणे महानगरपालिकेची ही कामगिरी अतिशय स्तुत्य आहे. या कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर मा. मुख्याध्यापिका सौ. उषा जयंत कळमकर यांचा थोडक्यात परिचय

डॉ. बेडेकर विद्या मंदिर ठाणे या ठिकाणी गेली २९ वर्षे कार्यरत असलेल्या सौ. उषा जयंत कळमकर यांचे व्यक्तिमत्त्व सर्वस्पर्शी आहे. पूर्ण विचाराने निवडलेल्या शिक्षकी पेशाविषयी त्यांना सार्थ अभिमान आहे. मधमाशी जसा मधाचा साठा करते तद्वतच त्यानी आपले व्यक्तिमत्व अनेक गुणांनी समृद्ध बनविले आहे. मराठी हा विषय घेऊन पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उषाताईंचे अनेक विषय आवडीचे आहेत. त्यांनी अनेक छंद जोपासले आहेत. ग्रंथ खरेदी करून वाचून काढणाऱ्या उषाताई उत्तम लेखिका आहेत. प्रवास वर्णने, विद्यार्थ्यांसाठी अभ्यासविषयक पुस्तके, त्यांनी लिहिली आहेत. गांधर्व विद्यालयाच्या ५ परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उषाताई उत्कृष्ठ हार्मोनियम वादक आहेत. वक्तृत्व व काव्यलेखन हा त्यांचा आवडीचा प्रांत आहे. स्वत:ला सतत घडवीत राहणाऱ्या उषाताईंनी - गीताव्रती परीक्षा, भारतीय संस्कृती दर्शन विद्यापीठाची उपासक परीक्षा, पत्राद्वारे दासबोध परीक्षा, भारतीय संस्कृती पीठ डोंबिवली - 'संस्कृति विंदु' पदवी, दासबोधाचा आठ वर्षाचा सखोल अभ्यास इ. परीक्षा दिलेल्या आहेत. श्री समर्थ रामदास व दासबोध यांचा खास अभ्यास त्यानी केलेला आहे व करीत आहेत. त्यांनी 'श्री समर्थ रामदास पदसंग्रह विशेषांकाचे लेखन केले' तसेच 'ओम् नवनाथ आशिश' या नियत कालिकाच्या त्या सहाय्यक संपादिका आहेत.

स्वत:ला घडवीत असतानाच सामाजिक बांधीलकी पण त्यांनी जपली. 'जनकल्याण समिती डोंबिवली' तर्फे घेतल्या जाणाऱ्या गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना विनामूल्य मार्गदर्शन केले. विशेष सेवा भावातून अपंग विद्यार्थिनीस हार्मोनिअम वादनास मार्गदर्शन केले. डोंबिवली नववर्ष स्वागत यात्रेतही त्यांचा विशेष सहभाग असतो. कीर्तनकुल डोंबिवली येथे 'मराठी साहित्य' या विषयाचे त्या मार्गदर्शन करतात. तसेच कीर्तन महाविद्यालय - डोंबिवली, जनकल्याण समिती डोंबिवली, शिवथरघळ - महाड, देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ, महाराष्ट्र साहित्य परिषद,

मना, त्वा चिरे पूर्वसंचित केले.

विवेकानंद केन्द्र कन्याकुमारी, समर्थ सेवा मंडळ सातारा इ. संस्थेच्या त्या सदस्य आहेत. या इतर सर्व पातळ्यांवर मिळणाऱ्या ज्ञानाचा उपयोग विद्यार्थ्यांना समृद्ध करण्यासाठी करतात अशा गुणवंत, ज्ञानवंत, कलावंत उषाताईंना विविध संस्थानी पुरस्कार देऊन गौरविलेले आहे. रोटरी क्लब, देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ, ब्राह्मण सेवा संघ, ब्राह्मण सभा - ठाणे यांनी 'आदर्श शिक्षिका पुरस्कार' देऊन त्यांना गौरविले आहे.

अशा गुणवंत शिक्षिका सौ. उषा जयंत कळमकर यांना ठाणे महापालिकेने 'आदर्श शिक्षक महापौर पुरस्कार' देऊन गौरविल्याने उषाताईंच्या व डॉ. बेडेकर विद्या मंदिराच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवल्याचे समाधान लाभत आहे.

●●●

**संकटांबद्दल**

संकटांना कधी कंटाळायचं नसतं।
त्यांना सामोरे जायचं असतं।
कुणी नावं ठेवली तरी थांबायचं नसतं।
अपमानानं कधी खचायचं नसतं।
जिद्दीने बळ वाढवायचं असतं।
निराश मुळीच व्हायचं नसतं।
चैतन्य सदा फुलवायचं असतं।
पाय ओढले म्हणून परतायचं नसतं।
पुढे आणि पुढेच जायचं असतं।
लोकनिंदेला कधी घाबरायचं नसतं।
आपलं सामर्थ्य दाखवायचं असतं।
जीवनात खूप करण्याजोगं असतं।
पण आपलं तिकडे लक्षच नसतं।
रागाने कोणाला बोलायचं नसतं।
प्रेमाने मन जिंकायचं असतं।
प्रेमात लहान-थोर पहायचं नसतं।
एकमेकांना आधार देऊन, मार्गदर्शन करायचं असतं।

(पान ११ वरून)

**भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना**

**Because, it has been kept out of the domain of Consciosness!!''**

''मानवी चैतन्यशक्तीच्या प्रांताबाहेर, आवाक्याबाहेर वासना वा शृंगाराची आकर्षणशक्ती ठेवली गेली आहे!!''

**बीजरूपी वेदज्ञान व भारतीय संस्कृती :**

त्यामुळे ह्या बीजाची-मानवी जीवाच्या बीजाची व ज्या विश्वक्रमात ह्या बीजापासून जी एक भारतीय सांस्कृतिक गंगाओघाची नदी ह्या पृथ्वीवर अवतरली आहे व भविष्यात वाढणार आहे, त्याची वेदज्ञानाने, उपनिषदांनी, भगवद्गीतेनी ओळख करून देण्याचा मोठ्ठा हातभार लावला आहे. ते दिशाच्या पुढील काही अंकातून सूत्ररूपाने पाहू या!!

॥ॐ शांति: शांति: शांति:॥

**यशवंत साने**
सोनल अपार्टमेंट,
सारस्वत बँकेशेजारी, अग्यारी लेन, ठाणे.
दूरध्वनी : २५३६८४५०
इ मेल : yrsane@eth.net

●●●

❖ **दिशा** ❖
**संपर्क**
**विद्या प्रसारक मंडळ**
**डॉ. बेडेकर विद्या मंदिर**
**नौपाडा, ठाणे - ४०० ६०२**
**दूरध्वनी - २५४२६२७०**

पुस्तक परिचय - १

# आनंदाचा झरा

ठाण्यातील लेखिका सौ. अनुराधा जोशी यांच्या दोन पुस्तकांचे सप्टेंबरमध्ये प्रकाशन झाले. त्यातील 'आनंदाचा झरा' चा हा परिचय - संपादक

'आनंदाचा झरा' या लेख व कथा संग्रहाचे उद्वेली प्रकाशन संस्थेने प्रकाशन केले आहे. याठिकाणी मला आवर्जून सांगावेसे वाटते की ही संस्था नवोदित लेखकांना ज्यांच्याकडे प्रतिभा आहे परंतु संधी मिळत नाही अशांना प्रोत्साहित करून लेखनासाठी हक्काचे व्यसपीठ मिळवून देणारी संस्था आहे.

लेखिका श्रीमती अनुराधा जोशी अनेक सामाजिक संस्थामधून काम करतात. व्यक्तिमत्त्व विकासासारखी समाजोपयोगी शिबीरेही त्या आयोजित करतात. त्यांचे एकूणच व्यक्तिमत्त्व चतुर आहे. साहित्यिक आणि सामाजिक वर्तुळात बरीच ओळख असल्याचे जाणवते.

'आनंदाचा झरा' कथा संग्रहाच्या नावाप्रमाणेच मुखपृष्ठाची अतिशय आकर्षक आणि मन उल्हासित करणारी सजावट श्रीमती वैशाली मेहेत्रे यांची आहे. रम्य निसर्ग वातावरणात झळाळता शुभ्र पाण्याचा झरा, आजुबाजूला छोट्या - छोट्या वेली, झुडुपे त्यावर उगवलेली नाजुक फुलं ''हिरवे हिरवे गार गालीचे'' या बालकवींच्या कवितेची आठवण करून देते. मुखपृष्ठ मनाला प्रसन्न आणि आनंद देणार आहे.

सामाजिक कार्याचे बाळकडू देणारे वकील कै. श्री. विश्वनाथ गोपाळ कुलकर्णी आणि त्यांच्या कठिण व संघर्षाच्या दिवसात आनंदाने संसार करणाऱ्या त्यांच्या मातोश्री कै. सौ. रखुमाबाई कुलकर्णी या दोघांच्या विनम्र स्मृतीस लेखिकेने हे पुस्तक अर्पण केले आहे.

सिद्धहस्त लेखिका श्रीमती मेघना साने यांची ओघवत्या रसाळ आणि मार्मिक भाषा असलेली ''अनुभवाचे सुसंस्कृत लिखाण'' अशा शिर्षकाची प्रस्तावना या पुस्तकाला लाभली आहे. लेखिकेच्या दृष्टीने ही आनंदाची आणि भाग्याची घटना आहे.

चार पाच पानांच्या छोट्या - छोट्या परंतु आशमघन अशा २५ कथांचा अंतर्भाव कथा संग्रहात आहे. पुस्तकाची पृष्ठसंख्या १२० असून किंमत फक्त रुपये शंभर एवढी माफक आहे.

लेखिका श्रीमती अनुराधा जोशी यांचे जीवन कष्टमय, संकटमय आणि संघर्षमय परिस्थितीतून गेले असल्याचे त्यांच्या मनोगतातून जाणवत. परंतु नैराश्येचे, वैकल्याचे अनेक प्रसंग आयुष्यात आले असले तरी तय खचल्या नाहीत किंवा आपले दुःख दुसऱ्यांसमोर उगाळत बसल्या नाहीत. आलेल्या प्रत्येक प्रसंगावर आत्मनिरीक्षण करून आपल्या अनुभवाचा उपयोग भावी पिढीसाठी व्हावा या जाणिवेतून त्यांनी लिखाण केले.

लेखिकेने अत्यंत सहजतेने, साध्या व सरळ भाषेत लिखाण केले आहे. कृत्रिमता, बोजडता कुठेच नाही. त्यामुळे सर्वसामान्य वाचकाला ते निश्चितच भावते. पुस्तकांतील कथा अनुभवजन्म आणि वास्तवाशी निगडित आहेत. कथा वाचताना लेखिकेने ती पाहिली अथवा अनुभवली आहे की काय? जे समोर घडते आहे तेच सांगत असल्याच जाणवते. ''सदर कथा व ललित निबंधाचे पुस्तक मराठीच्या विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरेल. अनेक प्रसंगातून विद्यार्थ्यांना सदाचाराचे दर्शन घडेल. बोली भाषा, मराठी वाक्प्रचार, म्हणी, मराठी संस्कृती

यांचा उत्तम नमुना या पुस्तकात दिसेल. लेखिकेच्या लेखनाला निश्चित दिशा आहे'' श्रीमती मेघना साने यांचे हे विचार अतिशय बोलके असून वाचताना त्याचा अनुभव येतो. मेघना साने प्रस्तावनेन पुढे म्हणतात, ''अनुराधा जोशी ही लेखिका पु.ल. देशपांडे नसेल, परंतु तिच्या लेखनाने आपण पुलकित होतो हे खरे. ती इंदिरा संत नसेल पण तिच्या मनात जागृत आहे एक संत. ती कथेमध्ये आशा नसेल परंतु हीच आहे उद्याच्या सुसंस्कृत लिखाणाची आशा.'' अत्यंत बोधपूर्ण आणि मार्मिक शब्दांत मेघना साने यांनी कथा संग्रहाविषयाच्या आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.

कथा संग्रहातील पहिलीच कथा - **स्मरण - तीवेळ** अंगावर शहारे आणणारी, वाचकांच्या चिरंतन स्मरणात राहील. कथेच्या शेवटी लेखिका म्हणते, ''रात्र संपली आणि दिवस उजाडला. माझ्या जीवनांतील ती काळरात्र काळोखात विरून गेली आणि नव्या अनुभवाचा सूर्योदय झाला. जीवनातील पुस्तकाचे हे पान मी उलटते खरे पण ते स्मरणात राहिले ते ह्या थरारक वेळेचे, म्हणूनच मी स्मरते ती वेळ'' कथा एक मोठा आशय सांगून जाते.

**अजन कथा एका सायकलीची :**

लेखाचे शीर्षक वाचून आश्चर्य वाटेल पण कथा वाचून मनाची करमणूक निश्चित होईल. खरंतर ही कथा सायकल, चोर आणि पोलिस यांची आहे. परंतु विनोदी पद्धतीने ती सांगताना पोलिसी खाते, कोर्टकचेऱ्या यांचा ससेमिरा याबाबत सत्य सांगून जाते.

**फॅशन्स - विचारधारा :**

एका वेगळ्याच पद्धतीने लिहीली आहे. फॅशन्स म्हणजे नवनवीन वस्त्रप्रावरणांचे व आधुनिक पैलूंचे दर्शन. कपड्यांतील, दागिन्यांतील फॅशन्स जेवढ्या महत्वाच्या वाटतात, त्याच्यापेक्षा श्रेष्ठ दर्जा व्यक्तिमत्वांतील गुण पैलूंचा ठरतो.

यत्र नार्यस्तु पूज्यते, रमन्ते तज देवत: स्त्रियांची पूजा म्हणजे त्यांचे स्वातंत्र्य नव्हे, त्यांना संतुष्ट ठेवावे असे स्मृती सांगते. स्त्रियांनी संसारात केवळ रमण्यापेक्षा तो नेटका करावा परंतु तो करता-करता राष्ट्राच्या संसाराला जोडावा. फॅशन्स संबधीचा विषय सत्य घटनांची उदाहरणे देऊन लेखिकेने हाताळला आहे. पाश्चात्यांचे अनुकरण करताना त्यांच्या फॅशन्सचा विचार करताना तेथील संस्कारांचा संस्कृतीचा तुलनात्मक सखोल विचार करूनच त्याचा स्वीकार करता. फॅशन्स काळाला समाजाला अनुरूप असाव्यात, जेणे करून सर्वच आनंदी होतील. एका वेगळ्या डायमेन्शनने लेखिकेने विचार मांडला आहे. वाचकाला तो अंर्तमुख करतो.

**अंगण :**

या कथेत लेखिकेने अंगणराचे महत्व आणि माहात्म्य सांगताना त्याच लोभसवाण चित्र नजरेसमोर उभे केले आहे. दोन घरांची अंगणे एकमेकासमोर असतात त्यातून नवी नाती जन्माला येतात. प्रेम, जिव्हाळा, माया यांचे दर्शन त्यातून होते. वादाला जशी वाचा फुटते तसेच सहकार्याचे हातही पुढे येतात व ऐकमेकांत गुंफले जातात ते ''अंगण'' नावाच्या वास्तूतच.

परंतु आज मात्र ही अंगण संस्कृती हरवली आहे. ते शोधता मिळत नाही. परंतु याने आपली प्रगतीची गती मंदावते आहे का यावर लेखिका म्हणते आपण प्रगतीसाठी ब्लॉक किंवा घराबाहेरच्या रिकाम्या मोकळ्या जागेला अंगण मानू या आणि त्यातले सुखी जीवन शोधू या. सकारात्मक आणि आशावादी दृष्टिकोनातून लेखिकेने विचार मांडला आहे.

**आनंदी झरा - डॉ. आनंदी गोपाळराव जोशी :**

डॉ. आनंदीबाई जोशींची कथा स्वत:च्या भाषेत विद्यार्थ्यांना सांगितली आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर जिद्दीने, आत्मविश्वासाने, परिश्रमाने मात करणाऱ्या सेवाभावी पतीभक्त डॉ. आनंदीबाई जोशी यांची महती लेखिकेने सांगितली आहे. वाचताना अंगावर रोमांच उभे राहतात, मन हेलावून जाते.

खरतर सगळ्याच कथा वाचनीय आणि आनंद देणाऱ्या आहेत. प्रत्येक कथे विषयी लिहिता येईल परंतु तो मोह जाणिवपूर्वक आवरीत आहे. जेणे करून रसिक वाचकांची कथा संग्रहाविषयीची उत्कंठा कायम राहील.

पुस्तक वाचनीय तर आहेच, परंतु संग्राह्य देखील आहे. रसिक वाचक त्याचे नक्कीच स्वागत करतील याची खात्री आहे.

काही - काही कथांतून शब्दांची द्विरुक्ती बरीच झाली आहे ती कमी करता आली असती तर बर झाले असते. परंतु त्यांनी लिखाणाला बाधा आलेली नाही. काही ठिकाणी वाक्य रचना मांडणी बदलली असती तर योग्य झाले असते. व्याकरणाकडे थोड अधिक लक्ष द्यावयास पाहिजे होते. अर्थात या अत्यंत छोट्या गोष्टी आहेत.

असो, श्रीमती अनुराधा जोशी यांचा कथा लेखनाचा पहीलाच प्रयत्न असला तरी त्या यशस्वी झाल्या आहेत. उत्तरोत्तर असंच लिखाण लेखिकेकडून होवो आणि रसिक वाचकांना त्यांच्या विविध साहित्याकृती वाचण्याची संधी मिळो यासाठी हार्दिक शुभेच्छा!

- ❖ आनंदाचा झरा - जोशी, अनुराधा
- ❖ ठाणे, उद्वेली बुक्स, २००८.
- ❖ पृ. ११९ मूल्य १००/-

**श्री. सुरेंद्र लागू**

२ / पहिला मजला, यमुना सोसायटी,
गोविंद बच्चाजी रोड, चरई, ठाणे
दूरध्वनी - २५३४९३४१

●●●

**यशाची नऊ रहस्ये**


- ❖ फक्त पैशांसाठी काम करू नये.
- ❖ आपण एखाद्या व्यवसायात का आहोत याचा अंतर्मुख होऊन विचार करा.
- ❖ कार्य संस्कृतीवर यश अवलंबून असते हे ओळखा.
- ❖ आपल्या व्यवसायाचा उपभोक्ता ओळखा, त्याला नीट जाणून घ्या.
- ❖ संवाद कौशल्यांचा प्रभावी वापर करा.
- ❖ माहिती व कल्पना यांची व्यवसायात नेहमी देवाण घेवाण व्हायला हवी.
- ❖ साधेपणात आनंद असतो.
- ❖ मिळणाऱ्या यशात समाधानी राहू नका.
- ❖ नेतृत्वाचे गुण विकसित करा.
- ❖ वरील नऊ रहस्यांमुळे दहावे रहस्य 'पैसा' हे फळ मिळते.

पुस्तक परिचय - २

# दि स्टेटमन्स इयरबुक २००९

जोशी - बेडेकर महाविद्यालयाच्या ग्रंथालयामध्ये अलिकडेच दि स्टेटमन्स इयरबुक : दि पॉलिटीक्स, कल्चर्स, ॲन्ड इकॉनॉमिज ऑफ द वर्ल्ड २००९ या वार्षिकाची भर पडली.

जागतिक पातळीवर एका विशिष्ठ वर्षात धडलेल्या राजकीय, सांस्कृतिक, आर्थिक आणि सामाजिक घटनांचा आढावा घेणारे हे जगन्मान्य 'वार्षिक' आहे. १८६४ पासून नित्यनेमाने प्रकाशित होणाऱ्या वार्षिकाची ही १४५ वी आवृत्ती आहे. बॅरी टर्नर या आभ्यासू संपादकाने संपादित केलेली ही आवृत्ती अतिशय माहितीपूर्ण आहे. १४५ वर्षांच्या स्टेटमन्स इयरबुकच्या इतिहासामध्ये बॅरी टर्नर हे फक्त सातवे संपादक आहेत. ही एक उल्लेखनीय बाब आहे. प्रकाशन व्यवसायात आंतरराष्ट्रीय पातळीवर नावलौकिक प्रस्थापित केलेल्या पालग्रेव्ह मॅकमिलन प्रकाशनाने ही आवृत्ती प्रकाशित केली आहे. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रकाशित होणाऱ्या वार्षिकांमध्ये स्टेटमन्स इयरबुकचा उल्लेख अग्रक्रमाने केला जातो.




या आवृत्तीमध्ये एप्रिल २००७ ते मार्च २००८ या काळात जागतिक पातळीवर घडलेल्या घटनांनी प्रत्येक महिन्याच्या आठवड्यांच्या क्रमाने माहिती दिलेली आहे. प्राथमिक पानांमध्ये महत्त्वाची जागतिक माहिती दिलेली आहे. त्यामध्ये २००८ मध्ये जगाची लोकसंख्या, ३० वर्षांच्या, ६० वर्षांच्या आतील लोकांची संख्या व शंभर वर्षांवरील लोकांची लोकसंख्या, जगात दररोज होणाऱ्या जन्म व मृत्यूंची संख्या, जगातील निरक्षर लोकसंख्या, जागतिक आर्थिक विकासदर इ. माहिती आपणास मिळते. या सोबतच जागतिक संकीर्ण माहिती जसे जननदर, शहरी लोकसंख्या, संरक्षणावर होणारा जागतिक खर्च, जगातील एकूण दूरदर्शन संच, रेडिआंची एकूण संख्या, इंटरनेट वापरणाऱ्यांची संख्या, भ्रमणध्वनी वापरणाऱ्यांची जागतिक संख्या इ. महत्त्वपूर्ण संकीर्ण माहिती आपणास यामध्ये मिळते.

दोन विभागांमध्ये मुख्य माहिती विभागलेली आहे. पहिल्या विभागात प्रमुख आंतरराष्ट्रीय संघटनांची माहिती दिलेली आहे. यामध्ये संयुक्त राष्ट्र संघटना व त्या सोबत युनोच्या विविध शाखा उदा. ILO, IMO, IMF, ITU, UNESCO, UNIDO, WHO, WIDO, IAEA, WTO, CTBTO इ. ची सखोल माहिती दिलेली आहे. प्रत्येक खंडातील आंतरराष्ट्रीय संघटनांची माहिती दिल्यानंतर शेवटी अधिक माहितीसाठी संदर्भसूची दिलेली आहे. संघटना अथवा संस्थेची स्थापना, पत्ता, व्याप्ती, उद्दिष्टे, सदस्यत्व, संघटनात्मक रचना इ. महत्त्वपूर्ण माहिती आपणांस मिळते.

दुसऱ्या भागामध्ये जगातील सर्व राष्ट्रांविषयीची माहिती इंग्रजी वर्णानुक्रमे दिली आहे. राष्ट्रांविषयी माहिती देताना नकाशा, भूभाग, ऐतिहासिक घटना, लोकसंख्या, हवामान, राज्यघटना, शासनपद्धती, राष्ट्रगीत, मंत्रिमंडळ, संरक्षण दले, अर्थव्यवस्था, वित्तसंस्था, महत्त्वाची नैसर्गिक साधनसंपत्ती, शेती, जंगल, व्यापार, पर्यावरण, उद्योगधंदे, आंतरराष्ट्रीय व्यापार, महत्त्वाची दळणवळण साधने, सामाजिक संस्था, धर्माशिक्षण पद्धती, आरोग्यपद्धती, आरोग्यविषयक सेवासुविधा, कल्याणकारी योजना, संबंधी देशाच्या इतर

(पान ३६ वर)

# परिसर वार्ता

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर (मा. वि.)

### 'श्री' चे आगमन :

दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी इ. ९ वी च्या विद्यार्थिनींच्या लेझीमच्या तालावर दीड दिवसांच्या 'श्री' चे आगमन झाले. यात दुपार विभागाचे विद्यार्थी, प्राथमिक विभाग, सौ. आनंदीबाई जोशी विद्यालयाचे प्राथमिक विभागाचे विद्यार्थी व शिक्षक सहभागी झाले. तर विसर्जनात सकाळ विभागाचे शिक्षक व विद्यार्थी सहभागी झाले.

### आदर्श शिक्षक :

भारत विकास परिषदेतर्फे दिला जाणारा 'आदर्श शिक्षक' पुरस्कार यंदा सौ. उज्ज्वला धोत्रे यांना प्राप्त झाला. तसेच 'आदर्श विद्यार्थी' म्हणून मुग्धा झाडकर (७ इ) आणि ओंकार सावंत (८ अ) यांना पुरस्कार प्राप्त झाला.

ठाणे महानगरपालिकेच्या वतीने कलाशिक्षिका सौ. मंजिरी दांडेकर यांचा सत्कार करण्यात आला. हा सत्कार ठाणे शहरातील सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, क्रीडा क्षेत्रात उत्कृष्ठ कामगिरी करणाऱ्या गुणीजनांचा केला जातो.

### शिक्षक स्पर्धा :

सरस्वती हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज राबोडी यांचे तर्फे शिक्षकांसाठी गीतगायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत सौ. धोत्रे व कु. वाघुले सहभागी झाल्या.

### बालविज्ञान प्रकल्प :

बालविज्ञान परिषदे अंतर्गत 'आपली वसुंधरा' या विषयावरील तीन प्रकल्पांची जिल्हा स्तरावर निवड झाली. या प्रकल्पांना सौ. धोत्रे, श्री. भोईर, श्री. देवघरे यांनी मार्गदर्शन केले.

### परीक्षण :

'मॅकमिलन' च्या इ. ९ वी साठीच्या विज्ञान प्रयोगवहीचे परीक्षण विज्ञान शिक्षक श्री. सोरटे, श्री. खैरनार, सौ. अडसुळे, श्री. शेलवले, श्री. शिरापुरी यांनी केले.

### कार्यशाळा :

इ. ५ वी ते ७ वी च्या विद्यार्थ्यांसाठी 'सकाळ' वृत्तपत्राच्या बालमित्र प्रबोधिनीतर्फे एक कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. कार्यशाळेसाठी श्री. वि. ह. भूमकर उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना स्वातंत्र्यसैनिकांच्या अनेक गोष्टी सांगितल्या.

### व्याख्यान :

समर्थ रामदास स्वामींच्या ४०० व्या जन्मवर्षानिमित्ताने, विद्यार्थ्यांना राष्ट्रीय संत समर्थांचे चरित्र समजावे, आजही त्यांच्या कार्याची गरज आहे हे लक्षात यावे व समर्थांकडून समर्थ प्रेरणा मिळावी या उद्देशाने इ. १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी समर्थभक्त आदरणीय सुनीलदादा चिंचोळकर यांचे 'विद्यार्थ्यांचे रामदास' या विषयावर व्याख्यान आयोजित केले गेले.

### बाह्यस्पर्धा यश :

❖ **क्रीडा :** तालुका स्तरावर झालेल्या आंतरशालेय पावसाळी खो-खो स्पर्धेत १४ वर्षे वयोगटातील व १७ वर्षाखालील मुलांचा संघ उपविजयी ठरला. तसेच मुलींचा संघ तालुका स्तरावर अंतिम विजेता ठरला.

❖ **गीतापठण :** 'श्रीमती जानकीबाई गोखले गीतापठण' स्पर्धेत अक्षय जाधव (९ ब), मिहीर गाडगीळ (९ ब) यांना अनुक्रमे तृतीय क्रमांक व उत्तेजनार्थ पारितोषिक प्राप्त झाले.

❖ **प्रश्नमंजुषा :** 'नवीन आणि अक्षय उर्जा मंत्रालय,

भारत सरकार आणि अधिकारी ब्रदर्स' यांनी आयोजित केलेल्या प्रश्नमंजुषा प्रारंभिक परीक्षेत स्नेहल मोरे (१० अ), अमेय गणमे (१० अ) यांची पुढील फेरीसाठी निवड झाली.

❖ **कराटे :** 'नाईनटिन्थ नॅशनल वर्ल्ड फनाकोशी शोतोकॉन कराटे चॅम्पीअनशीप' या संस्थेतर्फे झालेल्या स्पर्धेत ऋषिकेश सुतार (८ ब) यास सुवर्णपदक, कांस्यपदक व प्रमाणपत्र प्राप्त झाले.

❖ **जलतरण :** आंतरशालेय जिल्हास्तर, विभागीय स्तरावरील जलतरण स्पर्धेत कुणाल मोहिते (८ ब) यास प्रथम क्रमांक प्राप्त झाला तसेच आंतरशालेय राज्यस्तरीय स्पर्धेत त्याची निवड झाली.

❖ **NTS :** इ. ८ वी साठी घेतल्या जाणाऱ्या NTS परीक्षेत प्रफुल्ल खेडोकर (९ अ) यास शिष्यवृत्ती प्राप्त झाली.

❖ **देशभक्तिपर गीत :** भारत विकास परिषदेतर्फे 'चेतना के स्वर' या देशभक्तिपर गीत समुहगीत स्पर्धेत इ. ७ वी च्या निवडक विद्यार्थ्यांचा सहभाग होता.

इनरव्हील क्लब ऑफ ठाणे या संस्थेतर्फे घेण्यात आलेल्या 'देशभक्तिपर गीत' स्पर्धेत इ. ६ वी व ७ वी चे निवडक विद्यार्थी सहभागी झाले.

❖ **धान्य रांगोळी :** शारदोत्सवानिमित्त शाळेत धान्य रांगोळी स्पर्धा आयोजित करण्यात आली. यात इ. ६ वी ते ८ वी च्या २५ विद्यार्थ्यांनी भाग घेतला. पारितोषिक प्राप्त विद्यार्थी पुढीलप्रमाणे -

| | | |
|---|---|---|
| अक्षया पेणकर (८ अ) | - | प्रथम क्रमांक |
| संजय परब (६ इ) | - | द्वितीय क्रमांक |
| अनिकेत पवार (६ इ) | - | उत्तेजनार्थ |

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी माध्यम शाळा (प्रा.वि.)

दिनांक २१ सप्टेंबर रोजी घेण्यात आलेल्या श्रीमती जानकीबाई गोखले गीता पठण स्पर्धेत इयत्ता ४ थी च्या कुमारी मृणाल कर्णिक हीस तृतीय क्रमांकाचे बक्षीस मिळाले.

## सौ.आनंदीबाई केशव जोशी इंग्रजी माध्यम शाळा (मा.वि.)

✦ **राष्ट्रीय बालविज्ञान परिषदेकडून प्रकल्पाची निवड :**

२४ सप्टेंबरला तालुका स्तरावरील बालविज्ञान परिषद झाली आणि खालील गटांची जिल्हा स्तरासाठी निवड झाली.

**Child Obesity :**

सहभागी विद्यार्थी - मृदुला बापट (गट प्रमुख), वरूण निमकर, अपूर्व मेन, लुब्धा बेडमुठा, गीत गोरी.

**Effect of Urbanization of ground water level:**

सहभागी विद्यार्थी - अनुजा बोरवणकर (गट प्रमुख), चैतन्य भट, देवक व्यवहारकर, मृण्मयी मलईकर.

**Energy Implication of Waste Management :**

सहभागी विद्यार्थी - सिद्धी सुर्वे (गट प्रमुख), दिशा सत्रा, अर्ची गाला, रिद्धी छेडा, ऐश्वर्या दळवी.

✦ **श्रीमती जानकीबाई गोखले गीता पठण स्पर्धा:**

विद्या प्रसारक मंडळ आयोजित श्रीमती जानकीबाई गोखले गीता पठण स्पर्धेत गट क्र. २ मध्ये कु. नेहा पुसाळकर हिला द्वितीय क्रमांक आणि गट क्र. १ मध्ये कु. अदिती गोखले हिला उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले.

## विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे महापालिका विधी महाविद्यालय

**नव्या विद्यार्थ्यांची वाद स्पर्धा :**

नव्याने दाखल झालेल्या प्रथम वर्ष विधी वर्गातील विद्यार्थ्यांसाठी 'Even God cannot save India' या विषयावर २३-०८-०८ रोजी वादविवाद स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. स्पर्धेला विद्यार्थ्यांचा भरघोस प्रतिसाद मिळाला. स्पर्धा मराठी, हिंदी, इंग्रजी या तीनही भाषांत ठेवण्यात आली होती. परीक्षक म्हणून प्राध्यापक सौ. प्रज्ञा राजेबहाद्दूर, श्री. मनोज भट्ट व सौ. सैलेश वेंगुर्लेकर यांनी काम पाहिले. कु. सागवेकर निलाक्षी, ओक पूजा, आठवले आदिती यांची प्रथम, द्वितीय व तृतीय पारितोषिकासाठी निवड करण्यात आली. तसेच मराठी विषयातील पारितोषकासाठी दीपक बोटूंगले यांची निवड करण्यात आली.



**विद्यार्थी शिक्षक मेळावा :**

१२-०६-०८ रोजी विद्यार्थी व शिक्षक यांनी मिळून सांस्कृतिक कार्यक्रम साजरा केला. विद्यार्थ्यांनी नकला, गाणी तसेच अनेक मनोरंजनपर कार्यक्रम सादर केले.

दरवर्षीप्रमाणे यंदाही विद्यापीठ नियमांप्रमाणे महाविद्यालय विद्यार्थी परिषदेची स्थापना करून कु. स्नेहा पटवर्धन यांची चिटणीस पदी नियुक्ती करण्यात आली.

**विशेष व्याख्यान :**

२४ सप्टेंबर रोजी महाविद्यालयाच्या 'मनु सभागृहात' श्री. गजानन चव्हाण, अध्यक्ष, ठाणे वकील संघटना यांचे 'Plea Bargaining under criminal procedure code' या वेगळ्याच विषयावर, भाषण आयोजित करण्यात आले होते. श्री. चव्हाण यांचे भाषण उद्बोधक तसेच विचार करण्यासारखे होते. विद्यार्थ्यांना निश्चितच याचा फायदा होईल. विद्यार्थ्यांना कायद्यात होणारे बदल याची अद्ययावत माहिती देण्याचा आमचा प्रयत्न असतो. त्याचा हा एक भाग.

वृत्तसंकलन : **श्री. एस. व्ही. जोशी**

## वि.प्र.मंडळाचे तंत्रनिकेतन

**'GENESIS 08' स्पर्धेत वि.प्र. मंडळाच्या तंत्रनिकेतनच्या विद्यार्थ्यांनी पटकाविला प्रथम क्रमांक :**

रामराव आदिक इन्सस्टिन्ट्युट ऑफ टेक्नॉलाजी (RAIT) या संस्थेतर्फे GENESIS 08 ह्या स्पर्धेचे आयोजन दि. २६ आणि २७ सप्टेंबर रोजी करण्यात आले होते. तांत्रिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी एक सुवर्णसंधीच होती. या स्पर्धेमध्ये जवळ जवळ २२ अभियांत्रिकी महाविद्यालये व ५ तंत्रनिकेतनांनी भाग घेतला होता. यामध्ये वि.प्र. मंडळाचे, तंत्रनिकेतनच्या इलेक्ट्रॉनिक्स विभागातील द्वितीय आणि तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांनी भाग घेऊन चांगली कामगिरी केली.

Creative आणि Technical Paper Presentation या स्पर्धेत स्वप्नील प्रभू, अनुजा वैद्य आणि जान्हवी पायपुले या विद्यार्थ्यांनी RFID (Radio Frequency Interference Detection) या विषयावर पेपर सादर केला. त्यांच्या या सादरीकरणाला प्रथम




**'GENESIS 08' या स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांसह वि.प्र.मंडळाचे तंत्रनिकेतनचे प्राचार्य दि.कृ.नायक आणि इलेक्ट्रॉनिक्स विभागाच्या विभाग प्रमुख प्रा. सौ. कीर्ती अगाशे**

पारितोषक मिळाले.

Gen-x Enterpreneur या स्पर्धेतही उद्योजक बनण्यासाठी विद्यार्थ्यांची मानसिकता आणि तयारी याची चाचणी परीक्षकांनी विविध प्रश्न विचारून केली. त्यातही मयुरेश पाटील व मंदार कोळी या विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक मिळविला.

Robotics या स्पर्धेत अंतिम फेरीत प्रवेश केल्या बद्दल कुरियन मेलविन, प्रथमेश हाटले, ॐकार जोशी, धनंजय परब, धीरज अहेर, मोहित रहाळकर आणि प्रत्युश देशपांडे या विद्यार्थ्यांना उत्तेजनार्थ प्रशस्तिपत्रक मिळाले.

या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्तम कामगिरी केल्याबद्दल वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतनचे प्राचार्य दि. कृ. नायक इलेक्ट्रॉनिक्स विभागाच्या विभाग प्रमुख प्रा. सौ. कीर्ती अगाशे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्याकडून कौतुक करण्यात आले.

**राज्य पातळीवरील ''Biometrics, RFID And Emerging Technologies For Automatic Indentification'' या विषयाचे तांत्रिक निबंध स्पर्धेचे आयोजन :**

वि.प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन, ठाणे च्या ISTE Student चॅप्टरच्या वतीने राज्य पातळीवरील ''Bilmetrics, RFID and Emerging Technologies For Automatic Inedntification'' या विषयावर निबंध सादरीकरण स्पर्धेचे आयोजन दि. ६ सप्टेंबर रोजी करण्यात आले होते.

स्पर्धेचे उद्घाटन श्रीयुत नवल किशोर मारवा (संस्थापक आणि मॅनेजिंग डायरेक्टर, मागना सर्व्हिसेस इंडिया प्रा. लि.) याचे हस्ते करण्यात आले. आपल्या उद्घाटनपर भाषणात त्यांनी Biometric च्या RFID आणि विविध Identification पद्धती समाजामध्ये कशा उपयुक्त आहेत व त्याची जाणीव विद्यार्थ्यांना देऊन त्या देशाला पुढे नेण्यात त्याचा वाटा मोठा आहे असे म्हटले. अशा स्पर्धेतून नवीन तंत्रज्ञानाबद्दल माहिती होते.

स्पर्धेदरम्यान एकूण सतरा तांत्रिक निबंध सादर केले. नागपूर, पुणे, औरंगाबाद आणि मुंबई येथून विद्यार्थी आले होते. स्पर्धेत परिक्षक म्हणून श्री. समीर पानसे (M.B.A. मार्केटिंग, B.E. Electronics consultant Information Technology & Marketing) व प्रा. उदय पंडित




**राज्यस्तरीय तांत्रिक निबंध सादरीकरण स्पर्धा. डावीकडून प्राचार्य दि.कृ. नायक, संयोजिका सौ. गीताली इंगवले, श्री. समीर फणसे व श्री. उदय पंडित (परीक्षक)**

(M. Tech Control & Instrumentation B.E.I.E.) सहाय्यक प्रा. थाडोमल सहानी इंजिनियरिंग कॉलेज) यांनी काम पाहिले. विद्यार्थ्यांच्या सादरीकरण कौशल्यावर व त्यांनी निवडलेल्या आशयावर परिक्षकांनी समाधान व्यक्त केले. स्पर्धे दरम्यान सादर केलेले निबंध हे बहुतेक Casy study ह्या स्वरूपाचे होते. उदा. - RFID, Biometrics, Barcode Technology, Facial recognition system, Vein pattern, Biometric eneryption इत्यादी.

परीक्षकांच्या निवडीनुसार खालील विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व मानचिन्ह देऊन त्याचा गौरव करण्यात आला.

| | | |
|---|---|---|
| प्रथम पारितोषिक | : | श्री. अभिषेक अभ्यंकर व कु. संभावना सुवालकर (BVIT पुणे) |
| द्वितीय पारितोषिक | : | कु. करिश्मा ताम्हाणे आणि कु. चैताली पंगारे (व्ही.पी.एम. चे तंत्रनिकेतन, ठाणे) |
| तृतीय पारितोषिक | : | श्री. राहुल कुंदनानी व मयूर सोनी (IT उल्हासनगर) |
| उत्तेजनार्थ | : | कु. सुचिता प्रकाश पाथेरे (मुच्छाला पॉलिटेक्नीक) व अनिता शर्मा व मीनल श्रीश्रीमाळ (व्हि.पी.एम. चे तंत्रनिकेतन, ठाणे) |

स्पर्धे दरम्यान वि.प्र.मं.चे तंत्रनिकेतन प्राचार्य दि.कृ. नायक यांनी आपले मनोगत व्यक्त केले व स्पर्धा यशस्वी होण्यासाठी मोलाचे सहकार्य केले. ISTE Student Chatper च्या कार्यवाह प्रा. सौ. जी. एस. इंगवले यांनी कार्यक्रम संयोजक म्हणून काम पाहिले.

**'सण, उत्सव आणि विज्ञान' या विषयावर श्रीयुत दा. कृ. सोमण यांचे व्याख्यान :**

वि. प्र. मं. चे तंत्रनिकेतन, ठाणे 'Polytechnic Faculty's Get Together' इन्स्ट्रुमेंटेशन विभाग आयोजित 'सण, उत्सव आणि विज्ञान' या विषयावर पंचागकर्ते व खगोलतज्ज्ञ श्री. दा.कृ. सोमण यांचे व्याख्यान आयोजित केले होते. दि. ४ ऑक्टोबर २००८ रोजी तंत्रनिकेतनच्या दृक् श्राव्य कक्षामध्ये या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ऋतुमानाप्रमाणे सण आणि त्यांचा आहार त्याचप्रमाणे आरोग्य इत्यादी विषयीची माहिती त्यांनी उपस्थितांना करून दिली. शिवाय त्यांनी काही महत्वपूर्ण बाबीही सांगितल्या. या कार्यक्रमाला वि. प्र. मं. चे तंत्रनिकेतनचे प्राचार्य दि. कृ. नायक उपस्थित होते. त्यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या कार्यक्रमाला बहुसंख्येने उपस्थित होते.

वृत्त लेखन : **चंद्रकांत शिंगाडे**
वि.प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन, ठाणे

●●●

(पान ३१ वरून)

**दि स्टेटमन्स इयरबुक २००९**

देशांमधील राजदुतावास कार्यालये यासंबधी माहिती आढळते. सर्व देशांच्या राष्ट्रध्वजांची रंगीत चित्रे यामध्ये छापलेली आहेत.

या वार्षिकामध्ये भारतासंबधीची माहिती पृष्ठ क्रमांक ५९९ ते ६५२ मध्ये दिली आहे. भारतातील सर्व राज्ये केंद्रशासित प्रदेशांची सविस्तर माहिती यात मिळते.

स्टेटमन्स इयरबुक हे सर्वसामान्य वाचक, संशोधक, पत्रकार, व्यवसायिक, औद्यागिक अस्थापना इ. साठी अतिशय महत्त्वपूर्ण माहिती स्त्रोत आहे.

२००८ च्या स्टेटमन्स इयरबुकच्या मुद्रित आवृत्तीच्या खरेदीवर एका वर्षासाठी ऑनलाईन ॲक्सेस मोफत देण्यात आला आहे. त्यामुळे नियमितपणे अद्ययावत माहिती मिळण्यास मदत होते.

विद्या प्रसारक मंडळाच्या संकेतस्थळावर दि स्टेटमन्स इयरबुक उपलब्ध आहे. कृपया आपण www.vpmthane.org ला भेट द्यावी व अभ्यासासाठी, संशोधनसाठी, व अद्ययावत जागतिक माहिती घेण्यासाठी या संदर्भ साधनाचा वापर करावा.

**प्रा. एन. एस. बारसे**
ग्रंथपाल,जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे

# एका कर्म योग्याचे प्रकट चिंतन

एकसष्टी निमिताने आयोजित करण्यात आलेल्या डॉ. बेडेकरांच्या मुलाखतीचा वृत्तांत.

प्राच्यविद्येचे अभ्यासक, यशस्वी डॉक्टर, बेडेकर विद्या संकुल तसेच विद्याप्रसारक मंडळाचे संचालक, त्याहीपेक्षा एक सिद्धहस्त लेखक आणि या सगळ्या पदांना भूषण ठरावे ते म्हणजे एक चळवळीतला कार्यकर्ता, संवेदनशील माणूस अशा अनेक भूषणांनी ओळखले जाणारे डॉ. विजय बेडेकर जेव्हा स्वत:च्या आयुष्याचा जीवनपट उलगडतात तेव्हा सहा दशकांचा दीर्घ इतिहास डोळ्यासमोर उभा राहतो. दि. २३ ऑक्टोबर रोजी थोरले बाजीराव पेशवे सभागृहात एकसष्टी निमित्ताने माननीय विजय बेडेकरांच्या मुलाखतीचा कार्यक्रम झाला. 'सकाळ' चे ब्युरो चीफ श्री. प्रशांत दीक्षित व दिशाचे व्यासंगी लेखक श्री. यशवंत साने यांनी डॉक्टरांची मुलाखत घेतली.

**सुमेधाताईंचे मनोगत :**

सुरुवातीला डॉ. विजय बेडेकर यांच्या पत्नी सुमेधा बेडेकर यांनी पतीसोबतचे आपले भावविश्व उपस्थितांसमोर ठेवले. त्या म्हणाल्या, की डॉक्टरांची मते पक्की असतात. दुसऱ्यांच्या स्वातंत्र्याचा आदर करणे हा त्यांचा स्वभावच आहे. त्यांचे प्रत्येक भाषण नवीन दिशा देऊन जाते. अत्यंत वक्तशीरपणा हा त्यांचा गुण आहे. ठाण्यात शिवसेनेची स्थापनाही डॉक्टरांनीच केली, अशी माहिती त्यांनी दिली.

डॉक्टरांचे मित्र डॉ. उल्हास वैद्य, बेडेकर महाविद्यालयाच्या प्राचार्या शकुंतला सिंह, विद्याप्रसारक मंडळाच्या व्यवस्थापन विभागाचे डॉ. गुरुप्रसाद मूर्ती, डॉ. मो. दि. पराडकर आदींनी डॉक्टरांबद्दलचे अनुभव सांगितले.

**जीवन चिंतन :**

आपला जीवनपट उलगडताना डॉ. बेडेकर म्हणाले, ''वडिलांची परिस्थिती मध्यमवर्गीय होती. ते समाजवादी पक्षात असल्यामुळे घरात समाजवादी लोकांचा वावर होता. त्यांच्या विचारसरणीचा तसेच चिंतनशीलतेचा परिणाम आपल्यावर झाला. वैद्यकीय व्यवसायात मी जावे, अशी आईची आग्रही भूमिका होती. परंतु वडिलांनी माझ्यावर कधीही आपली मते लादली नाहीत. मी अनेक चळवळींमध्ये काम करीत होतो. वडील उदात्तवादी होते. चळवळींच्या मागची भूमिका पक्की नसेल आणि नेतृत्व कच्चे असेल तर चळवळी पुढे जाऊ शकत नाहीत, हा वडिलांनी दिलेला सल्ला मी आजही लक्षात ठेवला आहे.''

इतिहास संशोधव व प्राच्यविद्या संस्थेबद्दल बोलताना ते म्हणाले की, ''इतिहासाचे संशोधन करायचे असेल, तर आपल्याकडे साधनसामग्री उपलब्ध नाही. परदेशात अनेक वस्तूंचे संग्रह केले जातात. याचा परिणाम माझ्यावर झाला आणि ठाण्यात प्राच्यविद्या अभ्यास संस्थेची मी स्थापना केली.''

**गीता जगणारे डॉक्टर :**

''तत्वज्ञानात कामाला फार महत्त्व आहे. कर्म करीत राहणे हे माझे कर्तव्य आहे. कर्मामध्ये गुणरांबद्दल प्रवृत्ती आणि अवगुणांना निवृत्ती असते. तसेच कोणतेही काम करण्याची तळमळ माझ्यात आहे. कोणतीही संस्था तळमळ असलेल्या लोकांशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. त्यामुळे मला शेवटपर्यंत कर्म करीत राहणेच आवडेल,'' डॉक्टर प्रसिद्धी पेक्षा काम करण्यावर श्रद्धा ठेवतात. स्वत:चा

सत्कार करून घ्यावा हा त्यांचा पिंड नाही. ठाणे भूषण पुरस्कारही त्यांनी नकारला होता. लंडनच्या रॉयल एशियाटिक सोसायटीचे मानद सदस्यत्व फार कमी विद्वानांना मिळते. डॉक्टर अशांपैकी एक आहेत याचा आम्हाला अभिमान आहे.

त्यामुळेच त्यांचे मुक्तचिंतन समाजाला दिशा देणारे आहे. त्यांनी अनेक विषयांवर मार्गदर्शन करावे हा त्यांचा अधिकार आहे. या भावनेतूनच ही मुलाखत आयोजित करण्यात आली.

या कार्यक्रमात ब्राह्मण शिक्षण मंडळ, दीनदयाळ प्रेरणा केंद्र, अल्मेडा लायब्ररी, माध्यामिक शिक्षणेत्तर विद्यार्थी मंडळ, संस्कारभारती, प्राच्यविद्या अभ्यास संस्था, विद्या प्रसारक मंडळ, महाराष्ट्र साहित्य परिषद आदी संस्थाही सहभागी झाल्या होत्या.

**प्रा. मोहन पाठक**

ठाणे

●●●

❖ व्ही.पी.एम. दिशा ❖

**वर्गणीसाठी संपर्कः**

**विद्या प्रसारक मंडळ**

डॉ. बेडेकर विद्यामंदिर, नौपाडा, ठाणे.

दूरध्वनी २५४२६२७०

वार्षिक वर्गणी रूपये २५०/- फक्त.

मुखपृष्ठ २ वरून

संपादकीय

**भाषा आणि अभिनिवेश**

हा मराठीच्या समृद्धीचा मार्ग आहे, संस्कृतचा दुस्वास करणे हा नाही.

संस्कृत भाषेपासून मराठी निर्माण झाली तर मुलीचा चेहरा आईसारखा आहे अशी तक्रार का करायची. मात्र इंग्रजी या भाषेच्या अनाठायी आकर्षणामुळे ही मुलगी तिच्यासारखी दिसावी असे म्हटल्याने, अनावश्यक मेकअप केल्याने चेहऱ्याची ठेवण, सौंदर्य यात बिघाडच होईल. संस्कृतचा संबंध हा नैसर्गिक आहे.

दुसरी एक बकवास नेहमी ऐकू येते, ती म्हणजे बोली भाषा, बहुजनभाषा इ. भाषाशास्त्राचा आधार म्हणून अशा गोष्टींचे योगदान निर्विवाद असते. तो वादाचा मुद्दा होऊ शकत नाही. पण बहुजन समाजाच्या कळवळ्याचा आव आणून प्रमाण भाषा चळवळ कमकुवत करायची, प्रमाण भाषेचे महत्त्व कमी करायचे ही राजकीय खेळी आहे. इंग्रजीतील सर्व लेखन शब्दांच्या स्पेलिंगप्रमाणे करण्यात येते, लिहिले, छापले, बोलले जाते. मराठीच्या बाबतीत मात्र प्रमाण भाषेच्या निर्मितीची वेळ झाली की कोलांट्या उड्या का? परवलीचा शब्द वापरला की चर्चा अधिक ‘पुरोगामी’ होते, तो शब्द म्हणजे ब्राह्मणी भाषा. प्रमाण भाषा ही जर ब्राह्मणी भाषा असेल वा ब्राह्मणांची भाषा प्रमाण भाषेजवळ जाणारी असेल तर कोणत्या वैज्ञानिक कसोटीवर त्याला विरोध चालू आहे? मराठीच्या विकासाआड येणारे दुसरे महत्त्वाचे कारण या बेगडी पुरोगाम्यांनी भाषेला दिलेले जातीय स्वरूप आहे. खरे तर अविकसित समाज कायम अविकासित ठेवण्याचे ते षडयंत्र आहे.

●●●

# विद्या प्रसारक मंडळाच्या नियोजित अभियंत्रिकी महाविद्यालयाच्या जागेचे भूमिपूजन

वेळणेश्वर येथे मंडळाच्या नियोजित अभियांत्रिक महाविद्यालयाच्या जागेचे भूमिपूजन झाले. त्या कार्यक्रमाचा हा वृत्तांत- संपादक

विद्या प्रसारक मंडळ, ठाणे ही संस्था गेली ७५ वर्षाहून अधिक काळ ज्ञानदानाच्या माध्यमातून शिक्षण क्षेत्रात कार्यरत आहे. मराठी व इंग्रजी माध्यमांच्या शाळांबरोबरच कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, व्यवस्थापन शाखांची महाविद्यालये, तंत्रनिकेतन व प्रगत अभ्यास केंद्र अशा सर्वांगीण शिक्षणाची सोय संस्थेने केली आहे. आतापर्यंत मंडळाची कार्यकक्षा ही ठाणे शहरापुरती मर्यादित होती. ठाणे आणि मध्य रेल्वेवरील ठाण्याच्या पुढे असलेल्या उपनगरांतील विद्यार्थ्यांना ठाण्यातच शैक्षणिक सुविधा उपलब्ध व्हाव्यात याचा ध्यास कै. डॉ. वा. ना. बेडेकर यांनी घेतला होता आणि म्हणूनच ठाणे शहराचा शैक्षणिक विकास करण्याच्या उद्देशाने 'ज्ञानद्वीप' या संकुलात विविध विद्याशाखांच्या अभ्यासाची सोय करण्यात आली.

शैक्षणिक अभ्यासक्रमांच्या कक्षा व संस्थेचे कार्यक्षेत्र विस्तारित करण्याच्या उद्देशाने कोकणातील नयनरम्य अशा वेळणेश्वर, ता. गुहागर, जि. रत्नागिरी येथे जागा घेऊन संस्थेने प्रगतीचे आणखी एक पाऊल पुढे टाकले आहे. तेथे अभियांत्रिकी व तत्सम अभ्यासक्रम सुरू करण्यात येतील. वेळणेश्वर येथील नियोजित शैक्षणिक संकुलाच्या भूमिपूजनाचा समारंभ विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांच्या हस्ते, तसेच स्थानिक आमदार विनय नातू यांच्या प्रमुख उपस्थितीत विजयादशमीच्या शुभमुहुर्तावर ९ ऑक्टोबर रोजी सकाळी १०.०० वाजता पार पडला. या प्रसंगी मंडळाचे सर्व सदस्य, वेळणेश्वरच्या सरपंच महोदया, प्रकल्पाशी संबधित निमंत्रित, मंडळाचे



**भूमिपूजनाच्या वेळी डॉ. विजय बेडेकर**



**भूमिची पूजा करताना डॉ. विजय बेडेकर व सौ. सुमेधा बेडेकर**

वास्तुविशारद श्री. वसंतराव पानसरे, मंडळ संचलित सर्व शाळा - महाविद्यालयांचे प्रमुख, संचालक, त्याचप्रमाणे ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या प्रसंगी बोलताना स्थानिक आमदार डॉ. विनय नातू यांनी दर्जेदार शिक्षणाची समाजाला गरज असल्याचे



**मंडळाचे सर्व सदस्य**

सांगितले. विद्या प्रसारक मंडळ, ठाणे यासारख्या प्रथितयश शैक्षणिक संस्थेने कोकणात शैक्षणिक प्रकल्पाचे काम हाती घेतल्याबद्दल आनंद व्यक्त केला. त्याचप्रमाणे स्थानिक लोकप्रतिनिधी म्हणून कोणतीही मदत, सहकार्य करण्यास कायमच आपल्याबरोबर असू असे सांगून मंडळाच्या प्रकल्पास शुभेच्छा दिल्या. वेळणेश्वराच्या सरपंचांनी मंडळाच्या या प्रकल्पाला सर्व ग्रामस्थांच्या वतीने शुभेच्छा दिल्या.

मंडळाचे वास्तुविशारद श्री. पानसरे यांनी प्रकल्पाविषयी सविस्तर माहिती उपस्थिताना दिली. त्यांनी सांगितले की, या प्रकल्पामध्ये एकूण ६ लाख चौरस फूट नियोजित बांधकाम आहे. त्यामध्ये अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या वेगवेगळ्या इमारतींचे एकूण साडे चार लाख चौरस फूट बांधकाम असेल. या महाविद्यालयामध्ये काम करणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी अतिशय उत्तम व्यवस्था असलेले एक लाख चौरस फूट निवासी बांधकाम व पन्नास हजार चौरस फूट बांधकाम खेळ व मनोरंजन साधनांसाठी असेल.

या प्रसंगी आपले मनोगत, व्यक्त करताना डॉ. विजय बेडेकर म्हणाले की, 'महाराष्ट्रातच नव्हे तर आखिल भारतीय पातळीवर सर्वोत्कृष्ट ठरावे असे अभियांत्रिकी महाविद्यालय स्थापन करण्याचा, मंडळाचा प्रयत्न आहे.'



**आमदार डॉ. विनय नातू**

या 'स्वप्नवत' प्रकल्पाच्या स्थापनेमधील आव्हांनाची जाणीव असल्याचे सांगतानाच आपली जबाबदारी वाढली असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. त्यांनी स्थानिक आमदार, सरपंच, ग्रामस्थ यांचे आभार मानले व लोकप्रतिनिधी म्हणून या प्रकल्पाच्या मागे भक्कमपणे उभे राहून साथ देण्याची अपेक्षा व्यक्त केली. परंतु हे सांगत असतानाच ते पुढे म्हणाले की, 'आम्ही प्रकल्पात कोणत्याही प्रकारचे नियमबाह्य काम करणार तर नाहीच व तशा प्रकारच्या कामासाठी लोकप्रतिनिधींना देखील गळ घालणार नाही.'

मंडळाच्या शैक्षणिक विकासाचा आढावा घेताना त्याचे श्रेय त्यांनी कै. डॉ. वा. ना. बेडेकर, मंडळाचे विविध पदाधिकारी व सेवाभावी कार्यकर्ते यांना दिले.

कार्यक्रमाची सुरुवात श्री. अनिरुद्ध जोशी यांनी गायलेल्या सरस्वतीवंदनेने झालली. तर समारोप प्राचार्या डॉ. शकुंतला सिंग यांनी सादर केलेल्या प्रसायदानाने झाली. सूत्रसंचालन विद्या प्रसारक मंडळाचे कार्यवाह श्री. उत्तम जोशी यांनी केले. आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

वृत्तान्त लेखन - **प्रा. एन्. एस. बारसे**
ग्रंथपाल, जोशी-बेडेकर महाविद्यालय,
ठाणे

●●●

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

(स्थापना : १ ऑगस्ट १९३५)

## • विद्या प्रसारक मंडळाच्या घटक संस्था •

१) डॉ. बेडेकर विद्या मंदिर (प्राथमिक विभाग)
२) डॉ. बेडेकर विद्या मंदिर (माध्यमिक विभाग)
३) सौ. आनंदीबाई केशव जोशी इंग्रजी माध्यम विद्यालय (प्राथमिक विभाग)
४) सौ. आनंदीबाई केशव जोशी इंग्रजी माध्यम विद्यालय (माध्यमिक विभाग)
५) के. ग. जोशी कला महाविद्यालय व ना. गो. बेडेकर वाणिज्य महाविद्यालय
६) बाळकृष्ण नाईक बांदोडकर विज्ञान महाविद्यालय
७) वि. प्र. मंडळाचे टी. एम्. सी. विधी महाविद्यालय
८) डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यासक्रम संस्था
९) वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन
१०) वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन माहिती तंत्रज्ञान संस्था
११) वि. प्र. मंडळाचे प्रगत अभ्यास केंद्र

## उपक्रम

- भावे राष्ट्रीय व्याख्यानमाला
- डॉ. वा. ना. बेडेकर स्मृती व्याख्यान
- नारळीपौर्णिमा - संस्कृत दिन
- दशा व्यासपीठ
- विद्या प्रसारक मंडळ - वर्धापनदिन
- ५ सप्टेंबर - दिक्षान्त समारंभ

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006


# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

☆ *अत्याधुनिक दृक्श्राव्य यंत्रणा*
☆ *वातानुकूलित प्रसन्न वातावरण*
☆ *वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा*
*अशा सुविधांनी युक्त*

| सभागृहाचे नांव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत ३ रा मजला | १६० |
| पातंजली सभागृह | बा.ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा.ना.बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि.प्र.मं.चे ठाणे महानगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**☆ संपर्क ☆**

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०


हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.